- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

दैनिक
# सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर  संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : रविवार २३ ऑगस्ट २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २५३ | किंमत : २ रूपये

**सोने-चांदी**
- २४ कॅरेट : १,५८,७०० /-
- २३ कॅरेट : १,५६,३५० /-
- चांदी : २,७८,३००/-

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

## पुण्यात राहुल गांधी यांच्या 'छात्रों की गुंज' आधीच, अभाविप आणि एनएसयुआयमध्ये जुंपली.





दै. सिंहवाणी वृत्त.

**पुणे**; पुण्यात उद्या काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांचा छात्रों की गुंज कार्यक्रम होणार आहे. मात्र, या कार्यक्रमाआधीच भाजपाची विद्यार्थी संघटना अभाविप आणि काँग्रेसचे युवक संघटन एनएसयुआय यांच्यात जुंपली आहे.

अ भा वि प संघटनेच्या लोकांनी आम्हाला मारहाण केल्याचा आरोप एनएसयुआयने केला आहे. तर अभाविप संघटनेने काँग्रेस विद्यार्थ्यांकडून फी संदर्भात चुकीचे वदवून घेत घाणेरडे राजकारण करत आहे. दरम्यान, राहुल गांधी यांच्या दौऱ्याआधी झालेल्या या गोंधळामुळे काँग्रेसचे नेते विजय वडेट्टिवार देखील घटनास्थळी दाखल झाले आहेत.

पुण्यात उद्या काँग्रेस नेते राहुल गांधी यांचा 'छात्रों की गुंज' (Chhatron Ki Goonj Pune) हा कार्यक्रम आयोजित केला आहे. या कार्यक्रमात राहुल गांधी युवकांशी संवाद साधणार आहेत. मात्र त्याआधी काँग्रेसचे एनएसयुआ आणि भाजपाचे छात्र संघटन एबीव्हीपीमध्ये येथे हमरीतुमरी झाली आहे. या ठिकाणी काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार हेदेखील पोहोचले आहेत.

### दोन अनाथ मुलींना कोंडून ठेवले – विजय वडेट्टिवार

सीओईपीमधील या दोन अनाथ मुलींना कोंडून ठेवले. अभाविपच्या गुडांनी त्या अनाथ विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात सहभागी होऊ नये म्हणून त्यांच्यावर दबाव टाकत त्यांना मारहाण केली. कार्यक्रम उद्धवस्थ करण्यासाठी हे षडयंत्र रचले गेल्याचा आरोप यावेळी विजय वडेट्टिवार यांनी केला आहे.

सीओईपीमधील ज्या विद्यार्थीनीने फीच्या विरोधात तक्रार केली होती. तिचा एक व्हिडीओ व्हायरल होत आहे. त्यात तिने फी संदर्भात आपले आरोप चुकीचे असून ते आपल्याकडून वदवून घेतल्याचे सांगत कॉलेज प्रशासनाची माफी मागत आहे असा या विद्यार्थीनीचा व्हिडीओ देखील व्हायरल करण्यात आला आहे.

दरम्यान, सीओईपी सारख्या जागतिक दर्जाच्या तंत्रज्ञान विद्यापीठातील शुल्का संदर्भात चुकीच्या गोष्टी सावित्रीच्या लेकींकडून वदवून घेतल्या जात आहेत. खालच्या पद्धतीचे राजकारण काँग्रेसेला करावे लागत आहे, काँग्रेसच्या राहुल गांधींना ही छात्रों की गुंज ऐकू येत नाही का असा आरोप अभाविपने केला आहे. कोटा, डेहराडून आणि प्रयागराज नंतर आता पुण्यात राहुल गांधी 'छात्रों की गुंज' या कार्यक्रमासाठी येणार आहेत.

## सीमा सुरक्षित असेल तरच बंगाल सुरक्षित

### अमित शहा यांचा ममता बॅनर्जींवर निशाणा

दै. सिंहवाणी वृत्त.

**मुंबई** : सीमा सुरक्षित असल्याशिवाय पश्चिम बंगाल किंवा भारत सुरक्षित राहणार नाही, असं ठाम प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केले. पश्चिम बंगालमधील भारत-बांगलादेश सीमेवर कुंपण उभारण्यासाठी आवश्यक जमीन उपलब्ध करून देण्याची केंद्राकडून वारंवार विनंती करण्यात आली होती.

मात्र, तत्कालीन मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या सरकारने आवश्यक जमीन उपलब्ध करून दिली नाही, असा आरोप अमित शहा यांनी केला.

बंगालमध्ये भाजप सरकार सत्तेवर आल्यानंतर सीमा सुरक्षा मजबूत करण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी उपलब्ध होतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. अमित शहा यांनी आज पश्चिम बंगालमधील सिलीगुडी



येथील सशस्त्र सीमा दलाच्या मुख्यालयात विविध प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी केली. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

कार्यक्रमाला माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना आमंत्रित करूनही त्या उपस्थित राहिल्या नाहीत, याबद्दलही अमित शहा यांनी नाराजी व्यक्त केली. सुरक्षा दल ही कोणत्याही राजकीय पक्षाची किंवा सरकारची एजन्सी नसून, देशाच्या सीमांचं रक्षण करणारी राष्ट्रसेवेची दले आहेत. त्यामुळे सर्व राजकीय पक्षांनी आपल्या जवानांशी जवळचे आणि सौहार्दपूर्ण संबंध राखले पाहिजेत, असं त्यांनी सांगितलं.

बंकिमचंद्र चॅटर्जी यांच्या 'वंदे मातरम्' या अजरामर साहित्यकृतीने केवळ स्वातंत्र्यलढ्याला गती दिली नाही, तर स्वतंत्र भारत कसा असावा, याची दृष्टीही दिली, असं अमित शहा यांनी नमूद केलं. स्वातंत्र्य आणि फाळणीनंतरही 'वंदे मातरम्'चा पूर्णपणे स्वीकार झाला नाही, याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली.

## बारामतीत गूढ वाढले! माय-लेकाचा दुर्दैवी अंत, हत्येचा की आत्महत्येचा प्रकार?

दै. सिंहवाणी वृत्त.

**बारामती**: शहरातील तांदुळवाडी येथील दादा पाटीलनगर परिसरात शुक्रवारी (दि. २१) सकाळी माय-लेकाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली असून या घटनेमुळे मोठी खळबळ उडाली आली आहे .यामध्ये आई रमा विजय गावडे (वय ४१) यांच्या गळ्यावर काळसर व्रण आढळला असुन मुलगा वि

बारामती तालुका पोलिस ठाण्यात या प्रकरणी विजय गावडे यांनी खबर दिली आहे. विजय गावडे हे दि. २० ऑगस्ट रोजी रात्रीच्या पाळीसाठी जी.टी.एन. कंपनीत रात्रपाळीवर कामावर गेले होते. शुक्रवारी सकाळी ते बारामती शहरातील तांदुळवाडी येथील घरी परतले असता घराचा दरवाजा आतून बंद असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी पत्नी





रमा आणि मुलगा विवेक यांना आवाज दिला; मात्र आतून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही.त्यानंतर त्यांनी शेजारी राहणारे सुरज भिमराव शिंदे यांना बोलावून घेतले. दोघांनी घराचा दरवाजा तोडुन आत प्रवेश केला.यावेळी एका खोलीत विवेक हा गळफास घेतलेल्या अवस्थेत,तर त्याच खोलीतील खिडकीजवळ रमा गावडे झोपलेल्या आढळल्या. त्यांना आवाज देऊन व हलवून पाहिले असता कोणतीही हालचाल जाणवली नाही. त्यांच्या गळ्यावर काळसर व्रण असल्याचेही दिसून आले.

यावेळी त्यांचे मेहुणे हनुमंत वायसे घटनास्थळी आल्यानंतर त्यांनी पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर रमा गावडे आणि विवेक गावडे यांना तातडीने बारामती येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर दोघांनाही दि. २१ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजण्यापूर्वीच मृत घोषित केले.घटनास्थळी उपविभागीय पोलीस अधिकारी चैतन्य कदम,पोलीस निरीक्षक नारायण पवार यांनी भेट दिली. पुढील तपास पोलिस हवालदार सुधीर काळे करीत आहेत. या घटनेमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिसांकडून तपास सुरू आहे.

## महाराष्ट्र-हेसन भागीदारीला नवी दिशा; गुंतवणूक, रोजगार आणि कौशल्य विकासाला मिळणार चालना

दै. सिंहवाणी वृत्त.

मुंबई : जर्मनीतील हेसन राज्य आणि महाराष्ट्र यांच्यातील भागीदारी ही दोन आर्थिकदृष्ट्या सक्षम राज्यांमधील सहकार्य असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या भागीदारीतून गुंतवणूक, नवोन्मेष, रोजगार आणि कौशल्य विकासाला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

महाराष्ट्र आणि हेसनमधील परस्पर सहकार्य वृद्धिंगत करण्यासाठी सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित बैठकीत सामंजस्य करार करण्यात आला. या करारावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि हेसन राज्याचे अध्यक्ष बोरीस ऱ्हेइन यांनी स्वाक्षरी केली.

यावेळी मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी. अनबलगन, कौशल्य विकास आयुक्त अमित सैनी यांच्यासह जर्मनीच्या हेसन राज्याचे शिष्टमंडळ उपस्थित होते.

या करारामुळे हेसन हे महाराष्ट्रासाठी जर्मनी आणि युरोपमधील प्रवेशद्वार, तर महाराष्ट्र हे



हेसनसाठी भारत आणि इंडो-पॅसिफिक प्रदेशातील प्रवेशद्वार ठरेल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला.

विश्वास, ज्ञान, व्यापार, नवोन्मेष आणि लोकांमधील संबंधांच्या भक्कम पायावर भारत-जर्मनी भागीदारी उभी आहे. राष्ट्रीय स्तरावरील सहकार्याला आता राज्यस्तरीय आर्थिक भागीदारीची जोड मिळत असून, महाराष्ट्र आणि हेसनची आर्थिक ताकद, औद्योगिक प्रगती आणि नवोन्मेष क्षमता यामुळे हे सहकार्य अधिक बळकट होईल, असे मुख्यमंत्री म्हणाले. फ्रँकफर्ट हे युरोपमधील प्रमुख वित्तीय केंद्र, तर मुंबई ही भारताची आर्थिक राजधानी आहे. वित्त, उद्योग, तंत्रज्ञान, संशोधन आणि कुशल मनुष्यबळ या क्षेत्रांतील सामर्थ्यामुळे फ्रँकफर्ट आणि मुंबई परस्परांच्या अर्थव्यवस्थांचे प्रवेशद्वार बनू शकतात, असे फडणवीस यांनी सांगितले.

महाराष्ट्राला जगातील अग्रगण्य गुंतवणूक आणि नवोन्मेष केंद्र बनविण्याचा राज्य सरकारचा संकल्प असून, हेसनमधील उद्योगसमूह या प्रवासातील महत्त्वाचे भागीदार ठरू शकतात, असेही त्यांनी नमूद केले.

या सामंजस्य करारात उद्योग, सेवा, माहिती तंत्रज्ञान तसेच कुशल मनुष्यबळ आणि सीमापार गतिशीलता या चार प्रमुख क्षेत्रांचा समावेश करण्यात आला आहे.

औषधनिर्मिती, आरोग्यसेवा, अभियांत्रिकी, वाहन उद्योग, वित्तीय सेवा, लॉजिस्टिक्स, डिजिटल अर्थव्यवस्था आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) यांसारख्या क्षेत्रांत व्यापक सहकार्याच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

हेसनमधील उद्योगांनी महाराष्ट्रात अधिक गुंतवणूक करावी, तसेच महाराष्ट्रातील उद्योगांनी जर्मनी आणि युरोपियन बाजारपेठेत प्रवेश करण्यासाठी हेसनचा उपयोग करावा, असे आवाहन फडणवीस यांनी केले.

शिक्षण, संशोधन आणि कौशल्य विकास क्षेत्रातील सहकार्यालाही विशेष महत्त्व देण्यात आले आहे. नवी मुंबईजवळील एज्युकेशन सिटीमध्ये हेसनमधील अग्रगण्य विद्यापीठांनी सहभागी व्हावे, अशी अपेक्षा मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केली.

जर्मनीमध्ये कुशल मनुष्यबळाची वाढती गरज आणि महाराष्ट्रातील मोठा युवा वर्ग लक्षात घेता कौशल्य विकास आणि रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करण्यासाठी दोन्ही राज्यांनी सहकार्य करावे, असेही त्यांनी सांगितले.

कराराची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी संयुक्त कार्यगट स्थापन करण्यात येणार आहे. तसेच मुंबई आणि हेसन येथे नियमित 'महाराष्ट्र-हेसन बिझनेस डायलॉग' आयोजित करण्याचा प्रस्तावही मुख्यमंत्री फडणवीस यांनी मांडला. या भागीदारीमुळे उद्योग, गुंतवणूक, कौशल्य विकास, व्यावसायिक प्रतिनिधीमंडळांची देवाणघेवाण, गुंतवणूकदारांना सहाय्य आणि नव्या व्यावसायिक संधी निर्माण होण्यास चालना मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.


## कामेट शिखरावर फडकणार भारत अन् अर्जेंटिनाचा ध्वज

### ३५ जवानांच्या संयुक्त मोहिमेला हिरवा झेंडा

दै. सिंहवाणी वृत्त.

**नवी दिल्ली**: भारत आणि अर्जेंटिनाच्या सैन्याने आपल्या द्विपक्षीय आणि लष्करी सहकार्याला एका नव्या ऐतिहासिक उंचीवर नेण्यासाठी आणखी एका अत्यंत आव्हानात्मक मोहिमेचा प्रारंभ केला आहे. उत्तराखंडच्या चमोली जिल्ह्यातील समुद्रसपाटीपासून ७,७५६ मीटर (२५,४४६ फूट) उंच असलेल्या 'माउंट कामेट' शिखरावर चढाई करण्यासाठी दोन्ही देशांचा संयुक्त गिर्यारोहण संघ अधिकृतपणे रवाना झाला आहे.

या विशेष मोहिमेत भारतीय लष्कराचे २५ आणि अर्जेंटिनियन लष्कराचे १० असे एकूण ३५ अनुभवी जवान सहभागी झाले आहेत. नवी दिल्लीतील 'मानेकशॉ सेंटर' येथे आयोजित कार्यक्रमात डायरेक्टर जनरल इंटिग्रेटेड ट्रेनिंग आणि कर्नल कमांडंट लेफ्टनंट जनरल अजय रामदेव यांच्या हस्ते या पथकाला अधिकृतपणे हिरवा झेंडा दाखवण्यात आला. भारतीय लष्कराचे अनुभवी अधिकारी लेफ्टनंट कर्नल चिराग चॅटर्जी या मोहिमेचे नेतृत्व करत आहेत. नंदा देवी शिखरापाठोपाठ माउंट



कामेट हे गढवाल हिमालयातील दुसरे सर्वात उंच शिखर मानले जाते.

**उणे तापमान आणि ऑक्सिजनच्या कमतरतेचे आव्हान**

माउंट कामेटवर चढाई करणे तांत्रिकदृष्ट्या अत्यंत आव्हानात्मक मानले जाते. ७,७५६ मीटर उंचीवर हवेचा दाब कमी झाल्याने ऑक्सिजनची पातळी खालावते. उणे तापमान, वेगाने वाहणारे वारे, अचानक बदलणारे हवामान, खोल बर्फाळ दऱ्या आणि तीव्र उभ्या खडकांमुळे सैनिकांच्या शारीरिक सहनशीलतेची आणि मानसिक धैर्याची खरी परीक्षा लागणार आहे.

**लष्करी सहकार्याची तिसरी यशस्वी मोहीम**

भारत आणि अर्जेंटिना सैन्यामधील ही तिसरी संयुक्त गिर्यारोहण मोहीम आहे.

माउंट अकॉनकाग्वा (अर्जेंटिना): जानेवारी २०२५ मध्ये ६,९६१ मीटर उंच शिखरावर यशस्वी चढाई.

माउंट कुन (लडाख): ऑगस्ट २०२५ मध्ये ७,०७७ मीटर उंच शिखरावर यशस्वी चढाई.

> “ अशा प्रकारच्या आंतरराष्ट्रीय संयुक्त मोहिमा केवळ एका शिखरावर विजय मिळवण्यापुरत्या मर्यादित नसतात. या मोहिमा मित्र राष्ट्रांच्या सैनिकांमध्ये परस्पर विश्वास, आदर आणि आंतरराष्ट्रीय व्यावसायिक सामंजस्य अधिक दृढ करतात.
> — लेफ्टनंट जनरल अजय रामदेव





मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली 'एआय इन ॲग्रीकल्चर' संदर्भात बैठक. यावेळी मंत्री दत्तात्रय भरणे, राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## ६ फुटांवरील पीओपी मूर्तीच्या विसर्जनाला तात्पुरती परवानगी

**मुंबई** : प्लास्टर ऑफ उच्च पॅरिसपासून (पीओपी) तयार केलेल्या मोठ्या गणेशमूर्तीच्या विसर्जनाबाबत मुंबई न्यायालयाने अंतिम निकाल येईपर्यंत गेल्या वर्षीचा २४ जुलै २०२५ चा अंतरिम आदेश लागू राहणार असल्याचे न्यायालयाने गुरुवारी स्पष्ट केले. त्यामुळे सहा फुटांपेक्षा मोठ्या पीओपी गणेशमूर्तीचे गणे नदी, तलाव आणि समुद्रासारख्या नैसर्गिक जलस्त्रोतांमध्ये विसर्जन करण्यास तात्पुरती परवानगी कायम राहणार आहे.

२४ जुलै २०२५ च्या आदेशानुसार, सहा फुटांपेक्षा मोठ्या पीओपी मूर्तीचे नैसर्गिक जलस्त्रोतांमध्ये विसर्जन करण्यास ३१ मार्च २०२६ पर्यंत परवानगी देण्यात आली होती. आता या प्रकरणाचा अंतिम निकाल येईपर्यंत हाच आदेश लागू राहणार आहे.



मात्र, सहा फुटांपेक्षा लहान पीओपी मूर्तीचे विसर्जन कृत्रिम तलावांमध्येच करावे लागणार आहे. पीओपी मूर्ती विसर्जनासंदर्भातील याचिकांवरील सुनावणी पूर्ण झाल्यानंतर मुंबई उच्च न्यायालयाने १४ ऑगस्ट रोजी अंतिम निकाल राखून ठेवला. त्यावेळी निकाल येईपर्यंत ९ जून २०२५ रोजीचा अंतरिम आदेश लागू राहील, असे न्यायालयाने म्हटले होते. ९ जूनच्या आदेशानुसार पीओपी मूर्ती तयार करण्यास आणि विक्रीस परवानगी असली तरी त्यांचे नैसर्गिक जलस्त्रोतांमध्ये विसर्जन करण्यास मनाई होती. त्यामुळे गणेशोत्सव जवळ आल्याने सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमध्ये मोठ्या मूर्तीच्या विसर्जनाबाबत संभ्रम निर्माण झाला होता. ही परिस्थिती लक्षात घेऊन राज्य सरकारने बुधवारी उच्च न्यायालयाकडे स्पष्टीकरण मागितले. राज्याचे महाधिवक्ता मिलिंद साठे यांनी सरकारची बाजू मांडत अंतिम निकाल येईपर्यंत सहा फुटांपेक्षा मोठ्या पीओपी मूर्तीच्या

विसर्जनासाठी २४ जुलैच्या आदेशानुसार परवानगी कायम ठेवण्याची मागणी केली. त्यानंतर न्यायालयाने गुरुवारी याबाबत स्पष्टता दिली.

## खो-खो असोसिएशनचे कामकाज होणार पेपरलेस, सुनेत्रा पवारांच्या हस्ते 23 जिल्ह्यांच्या सचिवांना लॅपटॉपचे वाटप

दै. सिंहवाणी वृत्त.

**पुणे**;बदलत्या युगात नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार करत महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे संपूर्ण कामकाज आता 'पेपरलेस' होणार आहे. या डिजिटल उपक्रमांतर्गत असोसिएशनच्या जिल्हा संघटकांसह तांत्रिक समितीला लॅपटॉपचे वाटप करण्यात आले.

उपमुख्यमंत्री तसेच महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या अध्यक्षा सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते हे वाटप पार पडले. खेळ आणि खेळाडूंच्या सन्मानासाठी तसेच त्यांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी आपण सदैव पाठीशी राहू, अशी ग्वाही त्यांनी या वेळी दिली.

कै. अजितदादा पवारांच्या संकल्पनेतून खो-खो खेळाच्या चौफेर प्रगतीसाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे. लॅपटॉपमुळे असोसिएशनच्या सर्व प्रशासकीय कामात पारदर्शकता





आणि गती येईल.

**ऑक्टोबरमध्ये बारामतीत रंगणार 'भाई नेरुरकर चषक'**

महाराष्ट्रातील अत्यंत प्रतिष्ठित आणि महत्त्वाची मानली जाणारी 'कै. भाई नेरुरकर चषक राज्यस्तरीय खो-खो स्पर्धा' या वर्षी बारामतीमध्ये रंगणार आहे. महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र खो-खो असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन केले जाते. आगामी ऑक्टोबर महिन्यात होणाऱ्या या स्पर्धेच्या तयारीला असोसिएशनने आतापासूनच सुरुवात करावी, असे निर्देश सुनेत्रा पवार यांनी दिले.

**या 23 जिल्ह्यांच्या सचिवांना मिळाले लॅपटॉप**

असोसिएशनच्या पारदर्शक आणि डिजिटल कामकाजासाठी राज्यातील २३ जिल्ह्यांच्या सचिवांमागे लॅपटॉप सुपूर्द करण्यात आले. यामध्ये खालील जिल्ह्यांचा समावेश आहेः

अहिल्यानगर, बीड, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, धुळे, हिंगोली, जळगाव, जालना, लातूर
मुंबई, मुंबई उपनगर, नांदेड, नंदुरबार, पालघर, परभणी, पुणे
रत्नागिरी, रायगड, सांगली, सातारा, सिंधुदुर्ग, सोलापूर आणि ठाणे

### क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती

पुण्यात आयोजित या विशेष कार्यक्रमाला असोसिएशनच्या उपाध्यक्ष अश्विनी पाटील, सरचिटणीस डॉ. चंद्रकांत जाधव, कार्याध्यक्ष सचिन गोडबोले, खजिनदार गोविंद शर्मा, शिवछत्रपती क्रीडा संघटक पुरस्कारप्राप्त जनार्दन शेळके, अर्जुन पुरस्कारप्राप्त सुरेखा कुलकर्णी आणि श्रीरंग इनामदार यांसारखे क्रीडा क्षेत्रातील दिग्गज उपस्थित होते.

## अत्यंत फलदायक व्रत : पुत्रदा एकादशी

पुत्रदा एकादशी हे हिंदू धर्मातील एक महत्त्वाचे व्रत आहे. हे व्रत भगवान श्रीविष्णूना समर्पित असून, प्रामुख्याने संततीप्राप्ती आणि अपत्यांच्या दीर्घायुष्य आणि सुख-समृद्धीसाठी केले जाते. वर्षातून दोनदा येणारी ही एकादशी पौष आणि श्रावण महिन्यातील शुक्ल पक्षात येते. पुत्रदा एकादशीचे प्रकार- 1) पौष पुत्रदा एकादशीः पौष महिन्यातील शुक्ल पक्षातील एकादशी (डिसेंबर-जानेवारी), 2) श्रावण पुत्रदा एकादशीः श्रावण महिन्यातील शुक्ल पक्षातील एकादशी (जुलै-ऑगस्ट).पूजेचे महत्त्व आणि नियमसंतुष्ट जीवन- हे व्रत केल्याने अपत्य सुख मिळते आणि मुलांच्या प्रगतीमधील अडथळे दूर होतात

व्रत नियमः व्रताच्या दिवशी सकाळी लवकरात लवकर स्नान करून विष्णूची पूजा करावी. दिवसभर उपवास ठेवावा आणि रात्री जागरण करून विष्णू नामाचा जप करावा. सात्विकताः एकादशीच्या आधीपासूनच (दशमी तिथीपासून) सात्विक आहार व आचार पाळावा. दशमीच्या तिथीपासून लागू होणाऱ्या दशमीच्या दिवशीही कांदा-लसूण खाऊ नये. द्वादशीला उपवास सोडावा. तुम्हाला एकादशीचे व्रत असेल तर दशमीच्याच दिवशी सूर्यास्तापूर्वी भोजन करावे. पुत्रदा एकादशीच्या दिवशी सूर्योदयापूर्वी उठून स्नान करून स्वच्छ वस्त्र परिधान करावे. या दिवशी गंगेत स्नान करण्याचा नियम आहे. पण जर तुम्हाला हे जमत नसेल, तर तुम्ही आंघोळीच्या पाण्यात गंगाजल मिसळू शकता. स्नानानंतर भगवान श्रीविष्णूची विधीवत पूजा करावी. पंचोपचार विधीने भगवान श्री विष्णूची पूजा करून त्यांना धूप, दीप, फुल, अक्षता, रोली, फुलांच्या माळा आणि नैवेद्य अर्पण करावा आणि व्रताचा संकल्प घ्यावा. पूजेनंतर पुत्रदा एकादशी व्रताची कथा आणि दिवसभर उपवास ठेवावा. हवामान फळे खावीत आणि द्वादशीच्या दिवशी स्नान करून ब्राह्मणांना खाऊ घालावे आणि आपलेही करावे. ज्यानी एकादशीचे व्रत केले आहे त्यांनी लसूण, कांदा विरहित अन्न खाणे. यासह मनाने आणि शब्दाने ब्रह्मचर्य पाळणे. दशमीपासून द्वादशीपर्यंत भगवान विष्णूचे ध्यान करणे, अधिक योग्य ठरेल.

उपासनेचे विशेष नियम-

बालरूपाची पूजाः बालसुखाची कामना करण्यासाठी, बाळगोपाळांना पंचामृताने अभिषेक करावे आणि त्यांना पिवळे कपडे आणि अन्न अर्पण करावे. पाराणाचे महत्त्वः एकादशी व्रत दुसऱ्या दिवशी (द्वादशी तिथी) शुभ मुहूर्तावर सोडल्यानंतरच पूर्ण मानले जाते. दानः या दिवशी गरजूंना पिवळे अन्न किंवा कपडे दान करणे खूप शुभ मानले जाते. एखाद्या व्यक्तीने एखाद्या दिवशी उपवास केला नाही, त्यांनी एकादशीच्या दिवशी तामसिक अन्न देखील वर्ज्य करावे. यासह, खोटे बोलणे, अनैतिक कृत्य करणे, राग-लोभ, मोह, मत्सर अशा इतर गोष्टींपासून अंतर ठेवले पाहिजे. एकादशीत वैष्णव धर्माचे पालन करण्याच्या दिवशी, ते वांगी, सुपारी, मांस-दारू अशा मादक इतर गोष्टींपासून स्वतःला दूर ठेवावे. या दिवशी कांस्य भांड्यात खाऊ नये.

पुत्रदा एकादशी व्रत कथा– पुराणकाळात महिष्मतीपुरी नावाचा एक शांतीप्रिय, धर्मप्रिय असा एक राजा होता. मात्र त्याला स्वतः:चं मूल नव्हत. मग त्याच्या शुभचिंतकांनी एका लोमेश ऋषीला कारण विचारले, त्यांनी सांगितले की, मागच्या जन्मी महिष्मतीपुरी हा एक अत्याचारी, निर्दयी असा राजा होता. मागच्या जन्मी एकादशीच्या दिवशी हा राजा पाणी पिण्यासाठी एका जलाशयाजवळ आला. तेव्हा नुकतीच एक बाळंतिन पाणी पिण्यासाठी तेथे आली होती. मात्र राजाने तिला तेथून हटवले. त्याच्या दुष्कर्म कारणाने तो याजन्मी पिता बनू शकला नाही. त्यामुळे जर त्या शापातून मुक्तता हवी असेल, तर तुम्हाला हे व्रत करावे लागेल, तेव्हाच त्याचे पुण्य तुमच्या राजाच्या पदरी पडेल आणि त्यांना संतती प्राप्त होईल. या ऋषींच्या निर्देशानुसार, प्रजासेसने देखील हे व्रत केले. काही महिन्यांतच राणीने एका गोंडस बाळाला जन्म दिला. तेव्हापासून एकादशीला श्रावण पुत्रदा एकादशीचे व्रत केले जाते. उज्जैनचे ज्योतिषाचार्य पं. मनीष शर्मा यांच्या मते श्रावण हा मराठी दिनदर्शिकेतील पाचवा महिना आहे आणि याच महिन्यातील शुक्ल पक्षातील वर्षातील 11वी एकादशी राहते. एका वर्षात एकूण 24 एकादशी असतात, ज्या वर्षात अधिक महिना असतो, त्या वर्षात 26 एकादशी असतात.

व्रताचरण : 1) श्रावण सोमवार आणि एकादशीच्या योगात श्रीविष्णूंसोबतच महादेवाचीही विशेष पूजा करतात. शिवभक्तीसाठी श्रावण सोमवार अतिशय शुभ मानला जातो, कारण भगवान शिव हे या महिन्याचे आणि या ऋतूचे स्वामी आहेत. भगवान श्रीविष्णू हे एकादशीचे स्वामी मानले जातात. या कारणास्तव या दोन्ही देवतांची पूजा 23 ऑगस्ट रोजी एकत्र करू शकतात. 2) पुत्रदा एकादशीचे व्रत वर्षातून दोनदा केले जाते. एक पुत्रदा एकादशी श्रावण महिन्याच्या शुक्ल पक्षात आणि दुसरी पौष महिन्याच्या शुक्ल पक्षात येते. 3) ज्या जोडप्यांना संततीप्राप्ती हवी आहे आणि ज्यांना आपल्या मुलांसाठी आनंदी, निरोगी आयुष्य हवे आहे, ते विशेषतः पुत्रदा एकादशीचे व्रत करतात. 4) ज्यांना एकादशीचे व्रत करायचे आहे ते दशमी तिथीपासूनच सात्विक दिनचर्या अंगीकारतात. सात्विक आहार घ्यावा लागतो. दशमी तिथीच्या संध्याकाळी श्रीविष्णूची पूजा करावी लागते. 5) एकादशीला सकाळी लवकर उठून स्नानानंतर सूर्याला अर्घ्य देतात. ₹ऊँ सूर्याय नमः₹ या मंत्राचा जप करतात. 6) सूर्यपूजेनंतर घरातील मंदिरात भगवान श्रीविष्णूची पूजा करतात आणि एकादशीचे व्रत करण्याचे ठरवतात. 7) विष्णूपूजेतही महालक्ष्मीची मूर्ती ठेवतात. दोन्ही देवतांना केशर मिश्रित दुधाने अभिषेक करतात. तुळशीची पाने टाकून नैवेद्य दाखवतात. धूप आणि दिवे लावून आरती करतात आणि विधिवत पूजन केले जाते. 8) एकादशीला दिवसभर उपवास ठेवतात, म्हणजे अन्न सेवन करत नाहीत. फळे, फळांचे रस आणि दूध यांचे सेवन करतात. सकाळ संध्याकाळ विष्णुपूजेत ₹ऊँ नमो भगवते वासुदेवाय₹ मंत्राचा जप करतात. 9) एकादशीनंतर म्हणजेच द्वादशी तिथीला सकाळी स्नान करून श्रीविष्णूची पूजा करून कोणत्याही गरजूला अन्नदान करतात. त्यानंतर स्वतः जेवण करतात. अशा प्रकारे एकादशीचे व्रत पूर्ण होते. 10) श्रावण सोमवारी शिवलिंगावर जल, दूध, पंचामृत अर्पण करतात. यानंतर पुन्हा एकदा जल अर्पण करतात. महादेवाला बेलाची पाने, रुईची फुले, धोत्रा इत्यादी गोष्टी अर्पण करतात. ₹ऊँ नमः शिवाय₹ मंत्राचा जप करतात. परमेश्वराला मिठाई आणि फळे अर्पण करतात. धूप आणि दिवे लावून आरती करतात.

हिंदूशास्त्रे सांगतात, की पुत्रदा एकादशीचं व्रत विशेषतः संतान प्राप्तीसाठी ठेवलं जातं. ज्या जोडप्यांना संतान होण्यात अडचणी येत आहेत, ते लोक हे व्रत नक्की करतात. या व्रतामुळे त्यांना संतानसुख मिळण्यास मदत होते. इतकंच नाही, तर ज्यांना आधीपासूनच मुलं आहेत, त्यांनीही आपल्या मुलांच्या चांगल्या आरोग्यासाठी, त्यांच्या सुखासाठी आणि समृद्धीसाठी हे व्रत करतात. या व्रतामुळे घरात धन-धान्याची वाढ होते, आरोग्य चांगलं राहतं आणि व्यक्तीच्या सर्व इच्छा पूर्ण होतात.

पुत्रदा एकादशी शब्दशः पुत्र देणारी एकादशी हा एक हिंदू पवित्र दिवस आहे, जो हिंदू महिना पौष (डिसेंबर-जानेवारी) मधील शुक्ल पक्षाच्या ११व्या दिवशी एकादशी येतो. श्रावण (जुलै-ऑगस्ट) महिन्यातील दुसऱ्या पुत्रदा एकादशीपासून वेगळे ओळखण्यासाठी या दिवसाला पौष पुत्रदा एकादशी असेही म्हटले जाते , जिला श्रावण पुत्रदा एकादशी असेही म्हणतात. या दिवशी जोडपी उपवास करतात आणि चांगल्या पुत्रासाठी विष्णू देवाची पूजा करतात. हा दिवस विशेषतः विष्णूचे अनुयायी असलेल्या वैष्णवांकडून पाळला जातो. हिंदू समाजात मुलाला अत्यंत महत्त्वाचे मानले जाते, कारण तो वृद्धापकाळात आई-वडिलांची काळजी घेतो आणि श्राद्ध (पूर्वजांचे विधी) अर्पण करून मृत्यूनंतरच्या जीवनात त्यांच्या कल्याणाची खात्री करतो, असा समज आहे. जरी प्रत्येक एकादशी विशिष्ट ध्येयांसाठी निर्धारित केली असली तरी, पुत्रप्राप्तीचे ध्येय इतके महान आहे की दोन पुत्रदा (पुत्र देणारी) एकादशी त्यासाठी समर्पित आहेत. यावर्षी 2026 मध्ये ती 23 ऑगस्ट रोजी पाळली जात आहे आणि दुसरी एकादशी जानेवारीत पाळली जाईल.

# काश्मीर भारताचा भाग; अमेरिकन राजदूताच्या स्पष्टोक्तीवर पाकिस्तानचा तीळपापड !

**प्रा डॉ सुधीर अग्रवाल, वर्धा**

भारतातील अमेरिकेचे राजदूत सर्जियो गोर यांनी जम्मू-काश्मीरला 'भारताचा महत्त्वाचा भाग' म्हटल्यामुळे पाकिस्तानचा तीळपापड झाला असून, पाकिस्तानने इस्लामाबादमध्ये अमेरिकेच्या कार्यवाह राजदूत नताली बेकर यांना परराष्ट्र मंत्रालयात तलब करून तीव्र आक्षेप नोंदवला आहे.सर्जियो गोर यांच्या वक्तव्य केल्यामुळे, पाकिस्तानला मोठा कूटनैतिक धक्का बसला आहे. या विधानामुळे संतापलेल्या पाकिस्तानने इस्लामाबादमधील अमेरिकेच्या प्रभारी राजदूत नताली बेकर यांना तातडीने समन्स बजावून (तलब करून) तीव्र विरोध दर्शवला आहे.

सर्जियो गोर हे ऑगस्ट २०२६ मध्ये जम्मू-काश्मीरच्या दौऱ्यावर होते. श्रीनगरमध्ये मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला यांच्यासोबत झालेल्या बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी हे वक्तव्य केले. या दौऱ्यामुळे आणि वक्तव्यामुळे भारत-अमेरिका राजनैतिक संबंधांना बळकटी मिळाली असली, तरी पाकिस्तानने यावर अत्यंत आक्रमक प्रतिक्रिया दिली आहे.

**सर्जियो गोर काय म्हणाले?**

श्रीनगरमधील प्रसिद्ध दल सरोवरात शिकारा सफारीचा आनंद घेतल्यानंतर सर्जियो गोर म्हणाले, ₹जम्मू-काश्मीर हा भारताचा एक अत्यंत महत्त्वाचा भाग आणि कमालीचा सुंदर प्रदेश आहे₹. अमेरिकन नागरिकांना काश्मीरमध्ये येऊन येथील सौंदर्य पाहायला नक्कीच आवडेल. केंद्र सरकार आणि मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला यांनी सुरक्षेसाठी घेतलेल्या चांगल्या निर्णयांमुळे, अमेरिका काश्मीरसाठी लागू असलेल्या 'ट्रॅव्हल ॲडव्हायझरी'च्या (प्रवास इशारा) पातळीचा पुनर्विचार करेल, असे संकेत त्यांनी दिले.

पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयाने सर्जियो गोर यांचे वक्तव्य 'तथ्यात्मकदृष्ट्या चुकीचे' असल्याचे म्हटले आहे. जम्मू-काश्मीर हा भारताचा भाग असल्याचे पाकिस्तानने पूर्णपणे नाकारले आहे.हे वक्तव्य अमेरिकेच्या काश्मीर संदर्भातील दीर्घकालीन आणि ऐतिहासिक धोरणाशी सुसंगत नाही, असा दावा पाकिस्तानने केला आहे. अमेरिकेने सार्वजनिक वक्तव्ये करताना काश्मीरच्या वादग्रस्त स्थितीचा आदर करावा, असे पाकिस्तानने बजावले आहे.

पाकिस्तानी नेत्यांनी असा दावा केला आहे की काश्मीर हा संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या (UNSC) अजेंड्यावरील एक आंतरराष्ट्रीय वाद आहे, त्यामुळे अमेरिकी राजदूताला या इतिहासाची माहिती नसावी. अमेरिकेला जुन्या धोरणावरून घेरतानाच, पाकिस्तानने अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पूर्वी दिलेल्या भारत-पाकिस्तान मध्यस्थतेच्या प्रस्तावाचे कौतुक करून त्यांना त्याची आठवण करून दिली.

भारताची भूमिकाः जम्मू-काश्मीर हा भारताचा अंतर्गत विषय आणि अविभाज्य अंग आहे, या आपल्या भूमिकेवर भारत ठाम आहे. काश्मीर मुद्याचे आंतरराष्ट्रीयीकरण करण्याचा पाकिस्तानचा डाव या वक्तव्यामुळे अपयशी ठरला आहे. कलम ३७० रद्द झाल्यानंतर (२०१९ नंतर) कोणत्याही कार्यरत अमेरिकी राजदूताचा हा पहिलाच स्वतंत्र काश्मीर दौरा आहे.

या घडामोडीचे कूटनैतिक महत्त्वः

सर्जियो गोर हे डोनाल्ड ट्रम्प यांचे दक्षिण आणि मध्य आशियासाठीचे विशेष दूत म्हणूनही काम पाहत असल्यामुळे त्यांच्या या भूमिकेला जागतिक पातळीवर मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे.काश्मीरमधील बदलती सुरक्षा व्यवस्था आणि अमेरिकेचा भारताला मिळत असलेला हा पाठिंबा पाकिस्तानसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठा राजनैतिक धक्का मानला जात आहे. अमेरिकेकडून भारताच्या भूमिकेला अप्रत्यक्षपणे मिळालेल्या या समर्थनामुळे पाकिस्तानच्या कूटनीतीला मोठा झटका बसला आहे.

कूटनैतिक महत्त्वडोनाल्ड ट्रम्प यांचे निकटवर्तीयः सर्जियो गोर हे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे अत्यंत विश्वासू मानले जातात. तसेच ते दक्षिण आणि मध्य आशियासाठी अमेरिकेचे विशेष दूतही आहेत. त्यामुळे त्यांच्या या विधानाला थेट ट्रम्प प्रशासनाचा अधिकृत कौल म्हणून पाहिले जात आहे.भारताची मजबूत भूमिकाः जम्मू-काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आणि अंतर्गत विषय आहे, ही भारताची भूमिका जागतिक महासत्तेने जाहीरपणे मान्य केल्यामुळे भारताचे पारडे कूटनैतिक पातळीवर अधिक जड झाले आहे.

९५६१५९४३०६

# जैन बांधवांचा एक पवित्र व्रतविशेषः कलश दशमी




कलश दशमी- ज्याला सौभाग्य दशमी किंवा अक्षय फल दशमी असेही म्हणतात. हा प्रामुख्याने जैन धर्मामध्ये आचरला जाणारा एक पवित्र आणि महत्त्वाचा व्रतदिवस आहे. ही दशमी शुक्ल पक्षातील तिथीला येते. या व्रतामध्ये १० कलशांची स्थापना करून चोवीस तीर्थंकरांची आणि भगवान आदिनाथ यांची मनोभावे पूजा केली जाते. कलश दशमी जिला जैन धर्मामध्ये सुहाग- सौभाग्य दशमी किंवा अक्षय निधी दशमी म्हणूनही ओळखली जाते. हा जैन धर्मियांमध्ये पाळला जाणारा एक पवित्र व्रतविशेष आहे. हा सण किंवा व्रत प्रामुख्याने संतान, सुख, शांती आणि पापमुक्तीसाठी केला जातो. दिनविशेषकार श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी सदर संकलित महत्त्वपूर्ण लेख प्रस्तुत करताहेत... संपादक.

हिंदू बांधवांकडून चैत्र शुद्ध दशमीपासून पौर्णिमेपर्यंतच्या सहा दिवसांत मार्तंड भैरवाच्या अवतारासाठी कलश दशमीचे व्रत केले जाते. या दिवशी सकाळी उपवास धरून देवघरासमोर धान्याचे अष्टदल काढून त्यावर तांब्याचे ताम्हन व कलश मांडला जातो. यादरम्यान विधीनुसार घटस्थापना करून ऋषीगणांच्या आचरणावर पूजा केली जाते.

पूजेचा सविस्तर विधीः 1) सकाळी स्नानः दशमीच्या दिवशी सकाळी लवकर उठून स्नान करावे. 2) स्वच्छ वस्त्र परिधान करून व्रत व उपवास धरण्याचा संकल्प करावा. 3) घट- कलश मांडणीः देवघरासमोर पाटावर किंवा स्वच्छ जागी धान्याचे (तांदूळ किंवा गहू) अष्टदल वर्तुळ बनवावे. त्यावर तांब्याचे ताम्हन ठेवावे. 4) कलश स्थापनाः ताम्हनात तांब्याचा कलश (घट) मांडून त्याच्या मुखाभोवती आंब्याची वा इतर पवित्र पानांची पालखी किंवा वर्तुळ करावे. कलशात पाणी, सुपारी आणि वर्धक ठेवावे. 5) पूजनः षोडशोपचार किंवा मनोभावे कलशाची पूजा करावी. गंध, फुले, अक्षता व धूप-दीप दाखवून नैवेद्य अर्पण करावा. 6) कथा श्रवण व स्मरणः ऋषीगणांनी मार्तंड भैरवाच्या अवताराच्या प्रित्यर्थ केलेल्या या सहा दिवसांच्या व्रताची कथा वाचावी, सांगावी आणि ऐकावी. तसेच देवाचे स्मरण करावे.

कलश दशमीची पौराणिक कथाः राजगृह नगरात मेघनाद नावाचे राजे आणि त्यांची शीलवान व रूपवान पत्नी पृथ्वीदेवी किंवा पृथ्वीमती हिचेसह राज्य करत होते. ते दोघेही सुखात होते, पण त्यांच्या आयुष्यात एक मोठे दुःख होते- पूर्वजन्मातील पापामुळे त्यांना मूलबाळ- पुत्रसुख नव्हते. एक दिवस राणी पृथ्वीदेवी खूप दुःखी होऊन राजाला म्हणाली, ₹पुत्र नसल्यामुळे लोक मला बांझ म्हणून हिणवतात. हे दुःख मला सहन होत नाही.₹ त्याच वेळी त्यांच्या राज्यात शुभंकर मुनिराज- संत आले. राजा-राणी मुनिराज यांच्या दर्शनाला गेले आणि त्यांनी हात जोडून विचारले, ₹हे भगवंता, आमच्या पोटी संतान का नाही? आमच्या पूर्वजन्मात कोणते पाप घडले?₹ तेव्हा मुनिराज म्हणाले, ₹हे राजन, पूर्वजन्मात तुम्ही दोघे सेठ-सेठानी होते. त्या जन्मात तुम्ही एका मुनिराज यांच्या आहाराच्या वेळी अंतराय (अडथळा) आणला होता. त्या पापाच्या प्रभावामुळे तुम्हाला या जन्मी संतानसुख मिळालेले नाही.₹ हे ऐकून राजा-राणीने त्या पातकापासून मुक्त होण्यासाठी मार्ग विचारला. तेव्हा मुनिराज यांनी त्यांना कलश दशमी (अक्षय दशमी) या व्रताचे विधान सांगितले, ₹श्रावण शुक्ल पक्षातील दशमीच्या दिवशी उपवास करावा. जिनालयात -मंदिरात जाऊन १० कलश मांडून २४ तीर्थक्षेत्रांची व भगवान आदिनाथ-शीतलनाथ यांची भावपूर्ण पूजा करावी. ₹ॐ ह्रीं अक्षयनिधि प्रदायक श्री ऋषभदेवाय नमः₹ या मंत्राचा जप करावा. हे व्रत सलग १० वर्षे करावे आणि नंतर उद्यापन करून दीनदुबळ्यांना, अनाथ व साधर्मीयांना दानधर्म करावा. राजा-राणीने श्रद्धेने हे व्रत केले, ज्याच्या पुण्यप्रभावाने त्यांचे पाप नष्ट झाले आणि त्यांना संतानाचे सुख लाभले. या व्रतामुळे घरात सुख, समृद्धी, सौभाग्य आणि शांती टिकून राहते, असा विश्वास मानला जातो.

व्रत कथा व महत्त्व : चैत्र शुद्ध दशमी ते पौर्णिमा या काळात मार्तंड भैरवाचा अवतार कार्यकाळ मानला जातो. या अवताराच्या सिद्धीसाठी व ऋषीगणांनी केलेल्या कडक व्रताची आठवण म्हणून हे व्रत पाळले जाते. हे व्रत केल्याने घरात पुत्रप्राप्ती, सुख, शांती आणि मार्तंड भैरवाची कृपा लाभते, अशी धार्मिक श्रद्धा आहे. विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी !

**- संकलन व सुलेखन -**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी.**
**(दिनविशेषकार)**
**राह. श्रीगुरूदेव प्रार्थना मंदिरजवळ रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**

# नेमकी कारवाई कोणावर ?

या राज्यात मराठी बोलणा-यांनाच वाहन परवाना मिळेल, त्यांनाच वाहन चालविण्याची संधी मिळेल या परिवहन मंत्र्यांच्या घोषणेनंतर मराठी शिकण्याचा धंदा जोरात सुरू झाला असून अमराठी चालकांवर कारवाईचा बडगाही उचलला गेला आहे. मात्र त्यामुळे सार्वजनिक वाहतुकीवर त्याचा विपरीत परिणाम झाला असून मराठी भाषेच्या सक्तीवरून नेमकी कारवाई कोणावर होत आहे, हेच कळेनासे झाले आहे. म्हणजे जखम झाली पायाला आणि औषध लावले डोक्याला अशीच काहीशी परिस्थिती मुंबईमध्ये पहायला मिळत आहे.

मुंबईमध्ये नव्हे तर राज्यात मराठी भाषा कोणत्याही व्यावसायिकाला यायलाच हवी, कारण ती राज्याची भाषा आहे. दक्षिण भारतामधील राज्यांमध्ये तेथील राज्यभाषा ही प्रामुख्याने संभाषणासाठी वापरली जाते. केवळ व्यावसायिकच नव्हे तर तेथील नागरिकही कोणतीही सक्ती न मानता आपल्या राज्याच्या राज्यभाषेमध्ये बोलताना दिसतात. आपल्या राज्यातही मुंबई, पुणे सोडले तर तेथील दैनंदिन व्यवहाराची भाषा ही मराठीच आहे आणि असायलाच हवी. पण ज्या राज्याच्या निर्मितीसाठी आणि ज्या शहराचा समावेश या राज्यामध्ये व्हावा यासाठी १०७ जणांनी आपले रक्त सांडले त्या महाराष्ट्राच्या राजधानीमध्ये मात्र मराठी भाषा ही दुय्यम मानली गेली आहे. हे शहर आंतरराष्ट्रीय दर्जाचे आर्थिक केंद्र असल्यामुळे येथील भाषा प्रामुख्याने हिंदी आणि इंग्रजी असल्याचे सांगण्यात येत असले तरी प्रत्यक्षात तसे नाही. जपानच्या किंवा जर्मनीच्या राजधानीच्या शहरामध्ये जपानी आणि जर्मन भाषेचा प्रामुख्याने संभाषणात, व्यवहारात वापरली जाते. तेथे इंग्रजीचा वापर खूप मर्यादित स्वरूपात केला जातो. मग आपल्या ही

राज्याच्या राजधानीला का आणि कोणते वेगळे परिमाण लावले जाते. हे केवळ राजकारणासाठी आणि तेही सत्ताकारणासाठी वापरले गेलेले आयुध आहे. त्याचा परिणाम व्यावसायिकांवर नाही तर सर्वसामान्य नागरिकांवर होतो आहे. याचे ताजे उदाहरण म्हणजे रिक्षा-टॅक्सी चालकांना केलेली मराठी भाषेची सक्ती.

दोन महिन्यापासून परिवहन मंत्र्यांनी रिक्षा चालकांनी केवळ मराठीतच बोलले पाहिजे, यासाठी अन्य सर्व समस्या किंवा प्रश्न दूर सारून केवळ मराठीसाठी धावाधाव सुरू केली आहे. परिणामी मुंबईतल्याच नव्हे तर राज्यातल्या परिवहन विभागाच्या बहुसंख्य विभागीय कार्यालयांमध्ये सर्व कामे बाजूला सारून केवळ मराठी शिकण्याचे वर्ग भरविण्यात आले. त्या चार दिवसांमध्ये ही कार्यालये म्हणजे एखादी प्रौढांना प्रशिक्षण देणारी शाळा असावी असे चित्र दिसत होते. प्रशिक्षण देण्यासाठी ज्या संस्थांना आमंत्रित करण्यात आले होते, त्या संस्थांचे कार्यकर्ते विविध खोल्यांमधून आपले विद्यार्थी घेऊन बसले होते आणि परिवहन विभागाचे अधिकारी उरलेल्या जागेत जमेल तसे आपली कामे करत होते. ज्या चालकांनी चार दिवसांचे प्रशिक्षण पूर्ण केले त्यांना प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. पण त्यासाठी या चालकांची रोजीरोटी चुडाली याबाबत प्रशासनाला कोणतीही फिकीर नव्हती. त्यांना आपले ध्येय साध्य करायचे होते. याकाळामध्ये रस्त्यांवरून धावणा-या रिक्षा कमी होत्या. त्यातच बेस्टच्या कर्मचा-यांनी आपल्या मागण्यांसाठी बंद पुकारला होता. त्याची झळ सर्वसामान्य नागरिकांना बसली. सुदैवाने कोणत्याही मोठ्या परीक्षा या काळात नसल्या तरी कामावर जाणा-या चाकरमान्यांचे आणि शाळेत जाणा-या विद्यार्थ्यांचे हाल झाले. काही ठिकाणी तर नेमके काय झाले अहे हे न कळल्यामुळे नागरिकांनी ज्या काही रिक्षा

धावत होत्या त्या रिक्षा चालकांना मराठी व्यतिरिक्त अन्य भाषेत विचारले तेव्हा त्यांनी कुत्सितपणे हसत 'वो तुम्हारा मराठी क्लास है' ना म्हणत आपल्या रिक्षा भरधाव सोडल्या. आता याचा दोष कोणाला द्यायचा हेच कळेनासे झाले आहे. सरकारी धोरणे नेमकी कोणासाठी असतात, हे कळायला आपत्ती पूरी हयात जावी लागते, असे म्हणतात ते काही चुकीचे नाही. रिक्षा चालकांच्या या चार दिवसांच्या

अघोषित असहकाराचा परिणाम नंतर पुन्हा १८ तारखेपासून नव्याने दिसू लागला, याचे कारण परिवहन विभागाने सर्वांना ताकीद दिली की, मराठी न येणा-या रिक्षा चालकांवर कारवाई होणार आणि त्यांचे परवाने तीन महिन्यांसाठी निलंबित होणार स्वाभाविकच ज्यांना मराठी येत नाही आणि ज्यांनी प्रशिक्षण वर्गांना हजेरी लावलेली नाही अशा रिक्षा चालकांनी आपल्या रिक्षा बंद ठेवण्यात धन्यता मानली. काहींनी रिक्षा बंद ठेवल्या तर काहींनी रिक्षा ज्या रस्त्यावर परिवहन विभागाचे अधिकारी उभे नाहीत त्या रस्त्यांवरूनच गाडी नेणार असे सांगत प्रवाशांची नाडवणूक सुरू केलो. मुंब्र्सच्या उपनगरामध्ये टॅक्सीतून प्रवास करणा-या प्रवाशांची संख्या नगण्य आहे. उपनगरातील प्रवासासाठी रिक्षा किंवा बस हेच एकमेव साधन आहे. अशा वेळी रिक्षा चालकांनी या मराठी सक्तीच्या विरोधात असा अघोषित बंद पुकारला तर त्याचा त्रास रिक्षाचालकांना नाही तर सर्वसामान्य नागरिकांना होणार, हे कोणी लक्षात घ्यायला तयार नाही. सरकारला आपल्या धोरणाची अंमलबजावणी हवी तर राजकारण्यांना त्यांच्या राजकारणाची काळजी आहे. त्यात आता भर पडली आहे ती एप आधारित टॅक्सी

चालकांची. ज्यावेळी रिक्षा चालकांना मराठीची सक्ती करण्यात येत होती (पामध्ये टॅक्सी चालकांना

मराठीची सक्ती नाही हे महत्त्वाचे आहे) तेव्हाच सार्वजनिक वाहनांच्या चालकांना मराठीची सक्ती का करण्यात आली नाही. किंबहुना त्यांच्यासाठीही मराठी अनिवार्य का करण्यात आली नाही. याचा परिणाम म्हणजे अन्य भाषिकांच्या हातात असलेल्या अन्य वाहन सेवांच्या व्यवसायावर होऊ लागला आहे.

अलीकडेच समाजमाध्यमावर एक व्हिडीओ प्रसारित झाला आहे. त्यात एका एप आधारित गाडीच्या चालकाने प्रवाशाचा मराठीतील ओटीपी क्रमांक स्वीकारायला नकार दिला. 'मला मराठी येत नाही, तुम्ही इंग्रेजीत सांगा तरच मी सर्वच रिक्षा-टॅक्सी आणि एप आधारित

गाडीत तुम्हाला बसायला देईन' असे त्याने गुमीत हिंदी भाषेत सांगितले. स्वाभाविकच प्रवासी आणि चालक यांच्यात 'तू तू मैं मैं' झाली आणि त्याचा व्हिडीओ सर्वत्र पाठविला गेला. एका राजकीय पक्षाच्या युवा नेत्याने लगेच आपल्या मुलाखतीमध्ये त्या वाहन चालकाचा शोध घेऊन त्याला धडा शिकविणार असल्याचे सांगितले. (लवकरच त्या चालकाला शोधून त्याला फटकावत, शिक्षा करत मराठीमध्ये दिलगिरी व्यक्त करणारा व्हिडीओ सर्वांना पहायला मिळेल) याचा अर्थ आता भाषेवर आधारित राजकारण सुरू होणार, खळ्ळळ खट्याक होणार आणि नंतर योग्य पद्धतीने मराठी भाषा बाजूला ठेवून राजकारण शिजवले जाणार, यात त्रास नेमका कोणाला होणार? मराठी भाषा सर्वांना

आलीच पाहिजे हे मत योग्य असले तरी अनेकदा आपल्या राज्यात विविध भागात वेगवेगळ्या भाषेमध्ये मराठी चोलण्यात येते. विदर्भाकडे मराठी ऐवजी हिंदी भाषेचा जास्त वापर होतो कारण तेथील बहुसंख्य नागरिक शेजारील राज्यामध्ये व्यवहार करत असतात किंवा शेजारील राज्याचा प्रभाव वर्षानुवर्षे त्यांच्यावर असतो. अशा वेळी मराठी बोलायलाच पाहिजे पण त्या भागातील स्थानिक नागरिकांनी स्थानिक भाषांचा वापर सुरू केला तर मराठी बोलणा-या हिंदी भाषिकांचीही पंचाईत झाल्याशिवाय राहणार नाही. तेथील आदिवासी भागामध्ये गोंड, कोरकू, माडीया आणि आणखीही काही भाषा व्यवहारामध्ये आहेत. ठाणे जिहामधील काही भागात राहणा-या आदिवासींची भाषा त्यांच्या स्थानिक भाषेमध्ये वेगळी आहे. रायगड जिल्ह्यामध्ये कातकरी लोक त्यांच्या वेगळ्या भाषेत बोलतात. आता त्यांना मराठी समजत असले तरी ते मराठीचा वापर किती करतात हे तेथे वावरणा-या मराठी भाषिकांनाच कळेल. अशा वेळी मराठीची सक्ती का केली जाते. मराठी ही केवळ शहरी भागामध्येच वापरली जाते का? मराठी भाषेचे अनेक पदर आहेत. अहिराणी, खानदेशी, मागदेशी, सातारी, कोल्हापुरी, पुणेरी, उत्तर महाराष्ट्रीय, कोकणी (यात कोकणातील मराठी भाषा काही तालुक्यागणिक भाषा बदललेली आहे) अशा अनेक भाषा आहेत. एका मराठी भाषा तज्ज्ञाच्या माहितीप्रमाणे तब्बल ५२ पोटभाषा या मराठीच्या आहेत. अशा वेळी तुम्ही कोणत्या मराठीचा आग्रह धरता आहात. पुणेरी, मुंबई की अन्य, याचाच अर्थ मराठी भाषेची सक्ती करणे योग्य नाही.

परिवहन विभागाने दोन दिवसांमध्ये तब्बल १२०० हून अधिक रिक्षा चालकांचे वाहन परवाने तीन महिन्यांसाठी निलंबित केले आहेत. याचाच अर्थ इतक्या रिक्षा आता रस्त्यावरून कमी होणार?

एकतर मुंबईमध्ये प्रवासाला निघाले की, रिक्षा चालकांच्या भाडे नाकारण्याच्या मधुरीला तोंड देताना नाकीनऊ येतात, त्यात आता १२०० रिक्षा कमी धावणार. येत्या काही दिवसांमध्ये रिक्षा भाडी वाढणार आहेत. त्यामुळे अनेक प्रवाशांनी सार्वजनिक वाहतुकीकडे आपला मोर्चा अगोदरच वळविलेला आहे. यात आता रिक्षा चालकांच्या अभ्यास वर्गामुळे आणि मराठी सक्तीमुळे रिक्षा कमी होणार याचा नेमका अर्थ काय धरायचा. दोन दिवस मुंबईकर मराठीमध्ये येणार नाही, असे सांगणा-या मराठी आणि अमराठी मयुरीला तोंड देऊन वैतागले आहेत. ग्रामीण महाराष्ट्रामध्ये मीटर लावून रिक्षा चालविणे हेच अमान्य आहे. त्यात मराठीमध्ये बोलण्यासाठी सक्ती झाली तर काय बे अशाच उच्च आवाजात एखादा रिक्षा चालक बोलला तर काय करायचे, हे काही परिवहन मंत्र्यांनी सांगितलेले नाही.

सरकारनेही अद्याप त्याबाबत अधिकृत काही धोरण जाहीर केलेले नाही. मराठीची सक्ती सर्वांनाच करायला हवी. अगदी नाक्यावर गप्पा मारत बसलेल्या मराठी मुलांच्या टोळक्यालाही मराठीमध्ये बोलण्याचा आग्रह धरायला हवा. कारण नाक्यावर उभी असणारी मुले (ती जेन झीच असतील असे नाही) मराठी कमी आणि हिंदी मिश्रित इंग्रजी भाषेचा जास्त अवलंब करताना दिसतात. त्यांनाही मराठीमध्येच बोलायला सांगायला हवे.

मराठीचा वापर वाहन चालकांनी केलाच पाहिजे पण त्यांची मधुरीही मराठी भाषेतच चालणार आहे. सध्या मुंबईसारख्या आंतरराष्ट्रीय शहरामध्ये केवळ मराठी भाषिक राहत नाहीत. तरीही मराठीचा आग्रह असायलाच हवा. पण तो कोणासाठी. जर मराठी भाषिक प्रवाशाने मराठीमध्ये रिक्षा-टॅक्सी चालकांशी संवाद साधला तर त्यांना उत्तर मराठीत मिळायलाच हवे. पण एखादा उत्तर भारतीय किंवा दक्षिण भारतीय (अगदी गुजराती किंवा राजस्थानी

आला तरीही) प्रवासी आला आणि त्याने इंग्रजी भाषेत किंवा त्याच्या हिंदी भाषेमध्ये रिक्षा चालकांशी संवाद साधला आणि चालकाने मराठीतच बोलायला सुरुवात केली तर भाडे कसे स्वीकारणार, याचे उत्तर परिवहन मंत्र्यांकडे नाही. सरकारकडे नाही आणि फक्त मराठीचा आग्रह धरणा-यांकडेही नाही.

खरेतर मराठीचा आग्रह हवाच पण त्याहीपेक्षा प्रवाशांशी सौहादनि वागून त्यांना नकार न देता सेवा देण्यासाठी आग्रह भरायला हवा. वाहन चालकांमध्ये मयुरी जर भाषेमुळे येत असेल तर नक्कीच कोणतीही भाषा ही विसंवादीच होईल. पण मराठीचा आग्रह धरल्यामुळे परस्परांमध्ये संवाद होणार असेल तर त्यासाठी मग सर्वांनीच मराठीतच बोलले पाहिजे, सध्या त्याहीपेक्षा परवाने निलंबित करण्यापेक्षा अधिकाधिक रिक्षा रस्त्यांवर कशा धावलील आणि सर्वसामान्य नागरिकांना रिक्षा सहज कशा उपलब्ध होतील, याकडे परिवहन विभागाने लक्ष द्यायला हवे. अन्य कागदपत्रे तपासण्याऐवजी वाहन चालक मराठीत बोलतो का हेच तपासण्याची जबाबदारी आलेल्या परिवहन विभागाच्या अधिका-यांची होणारी कुचंबणा परिवहन आयुक्तांच्या आणि परिवहन मंत्र्यांच्या लक्षात आणून देण्यासाठी सर्वसामान्यांना इंग्रजी भाषेतून पत्रव्यवहार करावा लागणार असेल तर मराठी भाषा कोणासाठी हाच प्रश्न पडल्याशिवाय राहणार नाही.

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# रामटेकच्या विकासासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट

## पाणीपुरवठा योजनेसह विविध विकासकामांसाठी निधीची मागणी

दै. सिंहवाणी वृत्त.

**रामटेक शहर प्रतिनिधी** : रामटेक शहराच्या सर्वांगीण विकासाला अधिक गती मिळावी, नागरिकांच्या मूलभूत समस्या प्राधान्याने मार्गी लागाव्यात आणि विविध विकासकामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध व्हावा, यासाठी भारतीय जनता पार्टी रामटेकचे अध्यक्ष तथा नगरसेवक रजत ईश्वरजी गजभिये यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री माननीय नामदार श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांची भेट घेऊन विविध विकासकामांबाबत सविस्तर चर्चा केली.

या भेटीदरम्यान रामटेक शहरातील पाणीपुरवठा योजनेचा विषय प्रामुख्याने मांडण्यात आला. शहरातील नागरिकांना नियमित, पुरेसा आणि सुरळीत पाणीपुरवठा मिळणे ही अत्यंत महत्त्वाची बाब असून, पाणीपुरवठा योजनेची कामे वेळेत व गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण होण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याची मागणी मुख्यमंत्री महोदयांकडे करण्यात आली.

रामटेक शहराच्या वाढत्या लोकसंख्येचा विचार करता भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेऊन पाणीपुरवठा व्यवस्था अधिक सक्षम करणे आवश्यक आहे. यासाठी संबंधित योजनेच्या कामांना गती देणे, आवश्यक निधी उपलब्ध करून देणे तसेच नागरिकांना भेडसावणाऱ्या पाणीपुरवठ्याच्या समस्या कायमस्वरूपी दूर करण्याबाबत



यावेळी चर्चा करण्यात आली.

तसेच रामटेक शहरातील रस्ते, नाले, पथदिवे, स्वच्छता, नागरी सुविधा आणि इतर आवश्यक विकासकामांसाठी अतिरिक्त विकास निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली. शहरातील विविध भागांमध्ये नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित अनेक विकासकामे आवश्यक असून, त्यासाठी शासनस्तरावरून भरीव निधी मिळावा, अशी भूमिका यावेळी मांडण्यात आली.

यासोबतच रामटेक शहराच्या भविष्यातील विकासाचा व्यापक आराखडा, नागरिकांना आवश्यक मूलभूत सुविधा, शहराचे सुशोभीकरण तसेच विविध प्रलंबित प्रश्न याबाबतही मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याशी चर्चा करण्यात आली. रामटेकच्या विकासासाठी शासनाच्या माध्यमातून आवश्यक सहकार्य मिळावे, यासाठी सविस्तर निवेदनही यावेळी सादर करण्यात आले.

रामटेकच्या विकासाच्या दृष्टीने शासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळावा आणि शहरातील विकासकामांना अधिक गती मिळावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. रामटेकच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाच्या माध्यमातून आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचे रजत गजभिये यांनी सांगितले.

नागरिकांच्या समस्या आणि विकासाच्या प्रश्नांना प्राधान्य देऊन त्यांचा सातत्याने शासनदरबारी पाठपुरावा केला जात असून, रामटेक शहराला अधिक सक्षम, सुंदर आणि सुविधायुक्त बनविण्यासाठी आगामी काळातही प्रयत्न सुरू राहतील, असे यावेळी गजभिये यांनी स्पष्ट केले.

# नागपूरात रंगणार 'महाराष्ट्र केसरी' कुस्ती स्पर्धा

## वार्षिक सर्वसाधारण सभेत शिक्कामोर्तब

दै. सिंहवाणी वृत्त.

नागपूरः : वरिष्ठ गट गादी व माती राज्यस्तरीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा आणि महाराष्ट्र केसरी' किताब लढत २०२६-२७ नागपुरात रंगणार आहे. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाने नागपूर शहर जिल्हा कुस्तीगीर संघ आणि नागपूर महानगरपालिका यांच्या संयुक्त आयोजनाला अधिकृत मंजुरी दिली आहे.

नागपूर शहर जिल्हा कुस्तीगीर संघ आणि नागपूर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा नागपूर येथे रंगणार असून, आज(ता.२२) पिंपरी-चिंचवड (पुनावळे) येथील हॉटेल ब्लू वॉटर येथे आयोजित महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत या आयोजनावर शिक्कामोर्तब करण्यात आले. माजी आमदार तथा नागपूर कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष श्री. संदिप जोशी आणि सह संयोजक, मनपा सत्ता पक्ष नेता श्री नरेंद्र (बाल्या) बोरकर यांच्या मागणीनुसार, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष



श्री रामदास तडस व सरचिटणीस योगेश दोडके यांनी ही अधिकृत परवानगी जाहीर केली आहे. श्री नरेंद्र बोरकर यांचा प्रसंगी सत्कार करण्यात आले. त्यांच्या सोबत मनपाचे क्रीडा अधिकारी डॉ. पीयूष आंबुलकर ही उपस्थित होते. वार्षिक सर्वसाधारण सभेत वरिष्ठ गट ग्रिको-रोमन महाराष्ट्र केसरी, महिला महाराष्ट्र केसरी, तसेच १५, १७ व २० वर्षांखालील राज्यस्तरीय अजिंक्यपद स्पर्धांचे नियोजन आणि शासनाच्या 'मिशन लक्षवेध' योजनेवरही चर्चा करण्यात आली.

# किमान वेतन सल्लागार मंडळ स्थापन करून ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना सुधारित किमान वेतन लागू करावे

## कामगार राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांना ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेचे निवेदन

### सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन

दै. सिंहवाणी वृत्त.

**रामटेक शहर प्रतिनिधी** : महाराष्ट्र राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना सुधारित किमान वेतन लागू करण्यासाठी तातडीने किमान वेतन सल्लागार मंडळ स्थापन करावे, तसेच या मंडळावर ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची बाजू मांडण्यासाठी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना प्रतिनिधित्व द्यावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत कामगार राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांना निवेदन देण्यात आले.

रामटेक तालुका ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेचे तालुकाध्यक्ष विशाल हुड, तालुका सचिव शिल्पा ठाकरे, कोषाध्यक्ष प्रल्हाद साकोरे यांच्यासह तालुक्यातील ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते. यावेळी कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली.

संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, १० ऑगस्ट २०२० रोजी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना सुधारित किमान वेतन लागू करण्यात आले होते. त्यानुसार कर्मचाऱ्यांना त्यांच्या श्रेणीनुसार ११ हजार १२५ रुपये ते १४ हजार ६२५ रुपये इतके किमान वेतन देण्यात येत होते. या सुधारित किमान वेतनाची मुदत १० ऑगस्ट २०२५ रोजी संपुष्टात आली आहे.

दर पाच वर्षांनी किमान वेतनामध्ये सुधारणा होणे अपेक्षित असताना, सन २०२५ पासून किमान वेतन सल्लागार मंडळ कार्यरत नसल्यामुळे ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या सुधारित वेतनाचा प्रश्न प्रलंबित आहे. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडून ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना सुधारित किमान वेतन लागू करण्याबाबतचा मसुदा तयार करण्यात आल्याचे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. मात्र, किमान वेतन सल्लागार मंडळ कार्यरत नसल्यामुळे हा मसुदा अंतिम करून जाहीर करण्यास अडचणी निर्माण झाल्या आहेत.

यामुळे राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या हितासाठी शासनाने तातडीने किमान वेतन सल्लागार मंडळाची स्थापना करावी, तसेच सदर मंडळावर ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची प्रत्यक्ष बाजू मांडण्यासाठी युनियनच्या पदाधिकाऱ्यांना प्रतिनिधित्व देण्यात यावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. त्याचबरोबर प्रलंबित असलेले सुधारित किमान वेतन तातडीने लागू करून ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना न्याय द्यावा, अशीही मागणी करण्यात आली.

ग्रामपंचायत कर्मचारी हे ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या दैनंदिन कामकाजात महत्त्वाची भूमिका बजावत असून, गावपातळीवर विविध शासकीय योजना व प्रशासकीय कामांची अंमलबजावणी करण्यासाठी ते सातत्याने कार्यरत असतात. त्यामुळे त्यांच्या वेतनाचा प्रश्न अधिक काळ प्रलंबित ठेवू नये, अशी भूमिका संघटनेने व्यक्त केली.

यावेळी कामगार राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या मागण्यांची दखल घेत याबाबत सकारात्मक निर्णय घेऊन कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले.

# वेकोलीचा भयंकर हलगर्जीपणा!

**२५ लाखांच्या देखभालीनंतरही स्फोटकांच्या व्हॅनला लागली आग खापरखेड्यातील घटनेने खळबळ**

**खापरखेडा-प्रतिनिधी**

वेस्टर्न कोलफील्ड लिमिटेड (WCL) च्या सुरक्षेचा आणि वाहनांच्या देखभालीचा बोगसपणा समोर आला आहे १७ ऑगस्ट २०२६ रोजी धोकादायक स्फोटक साहित्य घेऊन जाणाऱ्या वेकोलीच्या एका एक्सप्लोसिव्ह व्हॅनच्या टायराला धूर निघून आग लागली होती.

सदर प्रकरणात धक्कादायक बाब म्हणजे एक्सप्लोसिव्ह व्हॅनच्या दुरुस्ती आणि देखभालीवर काही महिन्यांपूर्वी नोव्हेंबर २०२५ मध्ये २ लाख ५० हजार रुपये खर्च करण्यात आले होते असे असतांना सुद्धा एक्सप्लोसिव्ह व्हॅनचा अपघात घडल्याने नागरिक व कर्मचाऱ्यांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

१७ ऑगस्ट रोजी ही एक्सप्लोसिव्ह व्हॅन जवळपास ६ टन स्फोटके घेऊन जात असताना अचानक धूर व आग दिसून आली सुदैवाने स्थानिक चिकन विक्रेत्यांच्या तत्परतेमुळे आगीवर वेळेत नियंत्रण मिळवण्यात आले व मोठी घटना टळली जर ही आग आत असलेल्या स्फोटकांपर्यंत पोहोचली असती तर संपूर्ण खापरखेडा परिसरात घटना झाली असती.

एक्सप्लोसिव्ह व्हॅनवर नोव्हेंबर २०२५ मध्ये जवळपास २ लाख ५० हजार रुपयांचा निधी खर्च झाला असे असताना अवघ्या ९ महिन्यांत एक्सप्लोसिव्ह व्हॅनच्या टायरजवळ आग कशी काय लागते? हे समजण्या पलीकडे आहे.

देखभालीदरम्यान ब्रेक सिस्टीम, व्हील हब, वायरिंग व टायर्सची योग्य तपासणी झाली नव्हती का?

स्फोटक वाहतुकीसाठी लागणारे फिटनेस प्रमाणपत्र आणि सुरक्षा मानके डावलली गेली का? असे अनेक प्रश्न निर्माण होत आहेत.

या गंभीर प्रकारानंतर नोव्हेंबर २०२५ मधील २ लाख ५० हजार रुपयांच्या मेंटेनन्सचे वर्क ऑर्डर, सुटे भाग बदलल्याचे बिल, तपासणी अहवाल आणि फिटनेस सर्टिफिकिट सार्वजनिक करण्याची मागणी जोर धरत आहे सदर खर्च खरोखरच वाहनाच्या दुरुस्तीवर झाला की केवळ कागदोपत्री बिले काढली गेली याची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे.

एक्सप्लोसिव्ह व्हॅन स्फोटक वाहनातील छोटीशी तांत्रिक चूकसुद्धा शेकडो लोकांचा जीव घेऊ शकते त्यामुळे या घटनेला केवळ एक सामान्य वाहन दुर्घटना न मानता वेकोलीच्या हलगर्जीपणाचा गंभीर इशारा मानला पाहिजे. यासंदर्भात निष्पक्ष तांत्रिक चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई होणार की नेहमीप्रमाणे हे प्रकरण दाबले जाणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# खापरखेडा येथे डॉ. अनिरुद्ध वानकर यांचा भव्य प्रबोधन कार्यक्रम संपन्न



**खापरखेडा-प्रतिनिधी**

माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त व सद्भावना दिवसाच्या पर्वावर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या अनुसूचित जाती विभागाच्या वतीने अनुसूचित जाती के लोगो, बीजेपी छोड़ो अभियानाचा भव्य उद्घाटन समारंभ २० ऑगस्ट गुरुवारला सायंकाळी छत्रपती संभाजी महाराज चौक खापरखेडा येथे उत्साहात पार पडला सदर अभियानांतर्गत संविधान सत्यशोधक जलसा या विशेष प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

समतेची-संविधानाची गाणी महापुरुषांची या संकल्पनेवर आधारित या कार्यक्रमातून संविधान, सामाजिक समता आणि महापुरुषांच्या विचारांचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यात आला.

माजी मंत्री सुनील केदार यांच्या मुख्य आयोजनाखाली झालेल्या या सोहळ्यात डॉ. अनिरुद्ध वानकर यांच्या भव्य प्रबोधन कार्यक्रमाला शेकडो नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या प्रसंगी माजी जिल्हा परिषद अध्यक्षा मुक्ता कोकोड्डे, माजी उपाध्यक्ष कुंदा राऊत, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रवींद्र चिखले, जिल्हा काँग्रेस अध्यक्ष अश्विन बैस, गोविंदा ठाकरे, प्रकाश पराते, अनिल रॉय, प्रकाश खापरे, नीलिमा उईके, हेमराज परिहार, राहुल तिवारी, आशिष उपासे, विनय महाजन, प्रकाश माटे, सुनील पांडे, पंढरी उईके, विजय डेव्हिड, प्रमोद ढबाले, कपिल वानखेडे, रामू बसुले, केवल मेंढे, मिलिंद पाटील, माधव महल्ले, मधुकर दुगाने, गोपाळ रामेकर, आणि हंसराज सुखदेवे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे संचालन रविंद्र चिखले तर आभार सरपंच मीनाक्षी तागडे यांनी मानले.

# तुमसर हादरले! एकाच रात्री दोन घरी धाडसी चोऱ्या

## सुमारे १५ लाखांचा ऐवज लंपास

दै. सिंहवाणी वृत्त.

तुमसर : शहरातील माकडे नगर भागात चोरट्यांनी अक्षरशः उच्छाद मांडत एकाच रात्री दोन घरांना लक्ष्य केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या धाडसी चोरीत चोरट्यांनी सुमारे १५ लाखांचा मुद्देमाल लंपास केला असून, या घटनेमुळे तुमसर शहरात एकच खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, सीसीटीव्ही फुटेजवरून या गुन्ह्यात अंदाजे चार चोरट्यांची टोळी असल्याचा संशय व्यक्त होत आहे.

चोरीची सविस्तर माहिती

पहिली घटना : माकडे नगरातील रहिवासी तथा सेवानिवृत्त शिक्षक पांडुरंग साकुरे प्रकृती बरी नसल्यामुळे मागील काही दिवसांपासून चंद्रपूर येथे नातेवाईकांकडे राहात आहेत. घरात कोणी नसल्याची संधी साधून चोरट्यांनी समोरील दाराची कडी तोडून आत प्रवेश केला आणि संपूर्ण घर पालथे घातले. तिथून चोरट्यांनी चांदीचे दागिने लंपास केले. मात्र, सुदैवाने घरच्यांनी आधीच एका गुप्त ठिकाणी सोन्याचे दागिने व नगदी रक्कम लपवून ठेवली असल्याने





ती चोरट्यांच्या हाती लागली नाही.

दुसरी घटनाः याच भागातील दुसरे रहिवासी तथा सेवानिवृत्त नगरपरिषद कर्मचारी युवराज कोहपरे हे भोपाल येथे वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या आपल्या मुलाला आणण्यासाठी गेले होते. नेमकी हीच वेळ साधत चोरट्यांनी त्यांच्याही घराच्या समोरील दरवाजाची कडी फोडली. घरातील अलमारीत ठेवलेले साडेआठ लाख रुपये नगदी आणि चार तोळे सोने असा एकूण अंदाजे १५ लाख रुपयांचा मुद्देमाल लांबवला.

नागरिकांमध्ये तीव्र संताप आणि भीतीचे वातावरण

युवराज कोहपरे यांनी आपल्या मुलाच्या वैद्यकीय शिक्षणाचे शुल्क भरण्यासाठी ही मोठी रक्कम घरी आणून ठेवली होती. मात्र, तीच चोरीला गेल्यामुळे कोहपरे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, आता मुलाचे पुढील वैद्यकीय शिक्षण कसे करावे, असा मोठा प्रश्न त्यांच्यासमोर उभा ठाकला आहे.

सतत होत असलेल्या या घरफोड्यामुळे ₹पोलीस प्रशासन कुंभकर्णी झोपेत आहे का?₹ असा संतप्त सवाल तुमसरकर उपस्थित करत आहेत. चोरांना पोलिसांचा कोणताही धाक उरलेला नाही, असे



चित्र निर्माण झाल्यामुळे शहरवासीयांमध्ये तीव्र भीती आणि रोष पसरला आहे.

घटनेची माहिती मिळताच तुमसर पोलीस पोलीस ठाण्याचे ठाणेदार सुभाष बारसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक बाळासाहेब आघाव व त्यांच्या पथकांनी तात्काळ घटनास्थळ गाठून पंचनामा केला. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे चोरट्यांचा शोध घेण्याचे काम वेगात सुरू असून, लवकरात लवकर गुन्हेगारांना जेरबंद करण्यात येईल, अशी माहिती पोलिसांकडून देण्यात येत आहे.


# अभिनेते योगेश सोमण यांचा 23 ऑगस्ट रोजी सत्कार

दै. सिंहवाणी वृत्त.

नागपूर,22 ऑगस्टः

विदर्भ साहित्य संघ आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने प्रसिद्ध नाटककार व चित्रपट अभिनेते योगेश सोमण यांच्या सत्कार समारंभाचे रविवार, दि. २३ ऑगस्ट रोजी आयोजन करण्यात आले आहे.

सायंकाळी ५.३० वाजता सेवासदन शिक्षण संस्थेच्या माई मोतलग सभागृहात हा सोहळा होणार आहे. योगेश सोमण हे अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष असून, साहित्य क्षेत्रातील मातृसंस्था असलेल्या महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणेचेही अध्यक्ष आहेत. साहित्य, नाट्य आणि चित्रपट क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल हा सत्कार आयोजित करण्यात आला आहे.



विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी यांच्या हस्ते योगेश सोमण यांचा सत्कार करण्यात येणार आहे. यावेळी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे उपाध्यक्ष नरेश गडेकर तसेच नागपूर शाखेचे अध्यक्ष अजय पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

साहित्य, नाट्य आणि सांस्कृतिक क्षेत्रातील रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारिणी सदस्यांनी तसेच अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या नागपूर शाखेच्या सदस्यांनी केले आहे.

# डॉ. आंबेडकर इन्स्टिट्यूट ऑफ सोशल वर्कमध्ये 'फ्रेशर्स व फेअरवेल' उत्साहात संपन्न





नागपूर : डॉ. आंबेडकर इन्स्टिट्यूट ऑफ सोशल वर्क, नागपूर येथे नवप्रवेशित विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ फ्रेशर्स डे

आणि अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ फेअरवेल अत्यंत उत्साहात पार पडला. वरिष्ठ व कनिष्ठ विद्यार्थ्यांमध्ये आपुलकीचा संवाद निर्माण व्हावा आणि उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या अनुभवाचा फायदा नवीन विद्यार्थ्यांना व्हावा, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या प्रसंगी आयोजित सांस्कृतिक कार्यक्रम आणि स्पर्धांमधून विजेत्यांची निवड करण्यात आली मिस्टर फ्रेशर रितिक गेडाम मिस फ्रेशर सोनाली घोरमड मिस्टर फेअरवेल हेमंत राऊत मिस फेअरवेल शुभांगी येडे कार्यक्रमात शैक्षणिक क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या आणि स्पर्धा परीक्षांद्वारे शासकीय सेवेत निवड झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. 'संकल्प ग्रुप, बारामती' यांच्यातर्फे सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना भारतीय संविधानाच्या उद्देशिकेची फ्रेम भेट देऊन सनदशीर मूल्यांची जपणूक करण्याचा संदेश देण्यात आला. या वेळी यशस्वी विद्यार्थ्यांनी अभ्यासाचे नियोजन व स्पर्धा परीक्षांच्या तयारीबाबत मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे संचालक सौरभ थुलकर आणि श्रीमती मोहिनी धनस्कर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी प्राचार्य सुरेश वर्धे, सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सागर भोसले, श्वेता फुले, सांजवी निशाणे, आचल धवले, श्वेता खवले, फिझा शेख, शिवानी गोटा, समीर चौधरी, राहुल नंदेश्वर, दिनेश जांभेकर व आयोजन समितीच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# 'मंथन4युवा'अंतर्गत स्पर्धा परीक्षा महोत्सवाला २,३०० विद्यार्थ्यांची उत्स्फूर्त उपस्थिती

दै. सिंहवाणी वृत्त.

**नागपूर,** : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या युवा-केंद्रित दृष्टिकोनातून आयोजित करण्यात आलेल्या 'मंथन4युवा – नागपूर २०२६' अभियानांतर्गत स्पर्धा परीक्षा महोत्सवाचे आयोजन सुरेश भट सभागृहात करण्यात आले. या महोत्सवाला स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या तब्बल २,३०० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत सहभाग नोंदविला.

स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून प्रशासकीय सेवेत प्रवेश करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या युवकांना योग्य मार्गदर्शन, अभ्यासाची दिशा आणि परीक्षेच्या तयारीसाठी आवश्यक माहिती मिळावी, या उद्देशाने या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

नागपूरचे पोलीस आयुक्त श्री. विश्वास नांगरे पाटील (IPS), नागपूरचे जिल्हाधिकारी श्री. कुमार आशीर्वाद (IAS), श्री. ऋषी कुमार बिसेन (IRS), महाज्योतीचे संचालक श्री. मिलिंद नारिंगे, SIAC नागपूरचे संचालक श्री. लाखे, संयोजक श्री. रितेश गावंडे, व श्री. विष्णू चांगदे, डॉ. धर्मेंद्र तुरकर, डॉ. अतुल परशुरामकर तसेच नारायणा आयएएस अकादमीचे संचालक लाखे सर.यांच्यासह विविध मान्यवरांची उपस्थिती होती.

या वेळी उपस्थित मान्यवरांनी स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांशी संवाद साधत अभ्यासातील सातत्य, वेळेचे नियोजन, योग्य रणनीती, आत्मविश्वास आणि प्रशासकीय सेवेत काम करण्याची संधी याबाबत मार्गदर्शन केले.

युवकांना केवळ परीक्षेपुरते मर्यादित न ठेवता त्यांच्यात नेतृत्वगुण, निर्णयक्षमता आणि समाजाप्रती उत्तरदायित्वाची भावना विकसित करण्यासाठी 'मंथन4युवा' अभियानाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून आयोजित स्पर्धा परीक्षा महोत्सवाला मिळालेला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद उल्लेखनीय ठरला.

# तुमसर पोलिसांची अवैध धंद्यांविरुद्ध धडक कारवाई

## २ महिन्यांत १ कोटी ५१ लाखांहून अधिकचा मुद्देमाल जप्त ; ९६ आरोपींवर कारवाई

दै. सिंहवाणी वृत्त.

कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासह गुन्हेगारी प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी तुमसर पोलिसांनी मागील दोन महिन्यांत विविध अवैध धंद्यांविरुद्ध धडक मोहीम राबविली. १ जून ते २१ ऑगस्ट २०२६ या कालावधीत अवैध रेती चोरी व वाहतूक, दारू, जुगार तसेच सुगंधित तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीविरोधात कारवाई करण्यात आली.

अवैध रेती चोरीप्रकरणी १७गुन्हे दाखल करून २४ आरोपींवर कारवाई करण्यात आली.

सात जण हद्दपार

गुन्हेगारी प्रवृत्तीच्याव्यक्तींविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाई करत महाराष्ट्र पोलीस कायद्याच्या विविध कलमांन्वये एकूण ७ हद्दपारीचे प्रस्ताव मंजूर करण्यात आले असून संबंधितांना हद्दपार करण्यात आले आहे. तसेच



आणखी ४ प्रतिबंधात्मक प्रस्ताव दाखल करण्यात आले आहेत.

वाहतुकीच्या वाहनांसह तब्बल १ कोटी ३३ लाख ८१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

अवैध दारूबंदी कायद्यांतर्गत ३७गुन्हे दाखल करून ३९ आरोपींवर का रवाई करण्यात आली असून १४ लाख ५८ हजार ४५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

जुगारप्रकरणी २० गुन्हे दाखल करून २९ आरोपींवर का रवाई करत ५४ हजार ३२२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तर सुगंधित तंबाखूविरोधात ३ गुन्हे दाखल करून ४ आरोपींवर कारवाई करण्यात आली असून १ लाख ३९ हजार ९२२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ही कारवाई पोलीस अधीक्षक नूरुल हसन, अप्पर पोलीस अधीक्षक निलेश मोरे, उपविभागीय पोलीस अधिकारी शिवम विसापुरे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि तुमसर पोलीस निरीक्षक सुभाष बारसे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.

अवैध धंद्यांविरोधातील ही मोहीम पुढेही सुरूच राहणार असून, परिसरात कोणताही अवैध व्यवसाय सुरू असल्यास नागरिकांनी तत्काळ पोलिसांना माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन तुमसर पोलिसांनी केले आहे.

# राहुल गांधींचा विद्यार्थी संवाद म्हणजे नौटंकी युवकांना राजकारणासाठी भडकवू नये

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस युवकांचे 'यूथ आयकॉन'

दै. सिंहवाणी वृत्त.

**नागपूर :** राहुल गांधी यांच्या विद्यार्थी संवाद म्हणजे केवळ नौटंकी आहे. काँग्रेस पक्षाचा आलेख सातत्याने घसरत आहे. संपत चाललेल्या काँग्रेसला पुन्हा उभे करण्यासाठी विद्यार्थ्यांना पुढे करून राजकीय आधार मिळवण्याचा प्रयत्न केला जात आहे. राजकीय उद्देश साध्य करण्यासाठी युवकांचा वापर करून राहुल गांधी देशभरात अशा प्रकारची नौटंकी करीत असल्याचा आरोप महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला.

महसूल मंत्री व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शनिवारी नागपुरात प्रसार माध्यमांशी संवाद साधला.

युवकांना राजकारणासाठी भडकवू नये

पुण्यातील घटनेवर प्रतिक्रिया देताना बावनकुळे यांनी काँग्रेसवर गंभीर आरोप केले. युवकांना पुढे करून संघर्षाची परिस्थिती निर्माण करायची, त्यातून सहानुभूती मिळवायची आणि युवकांची मते आपल्याकडे वळवायची, असा काँग्रेसचा प्रयत्न असल्याचा आरोप त्यांनी केला. पक्षीय राजकारणासाठी युवकांची माथी भडकवण्याचे काम करू नये, अशी आमची भूमिका आहे, असे ते म्हणाले.

मुख्यमंत्री फडणवीस युवकांचे 'यूथ आयकॉन'



नागपुरात होणाऱ्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'झेन-झी संवाद' कार्यक्रमाबाबत बावनकुळे म्हणाले की, देवेंद्र फडणवीस हे नेहमीच युवकांचे 'यूथ आयकॉन' राहिले आहेत. महाराष्ट्रातील युवकांचा त्यांच्यावर विश्वास असून त्यांच्या भूमिकेशी युवक सहमत आहेत. नागपुरात होणाऱ्या या कार्यक्रमाच्या धर्तीवर मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रभर अशा प्रकारचे कार्यक्रम आयोजित केले जातील. हा कार्यक्रम मुख्यमंत्री फडणवीस यांच्या पसंतीचा असल्याचेही त्यांनी सांगितले.

**युवकांना विज्ञान-तंत्रज्ञानाकडे नेण्याची गरज**

विजय वडेट्टीवार यांच्या आरोपांवर प्रतिक्रिया देताना बावनकुळे यांनी काँग्रेसच्या कार्यक्रमावर टीका केली. काँग्रेस पक्ष राहुल गांधी यांच्या माध्यमातून पक्ष वाचवण्यासाठी हा कार्यक्रम घेत असल्याचे त्यांनी म्हटले. युवकांना माथी भडकावून राजकारण करण्याऐवजी त्यांना विज्ञान, तंत्रज्ञान आणि प्रगतीच्या दिशेने घेऊन जाण्याची गरज आहे. राजकारणासाठी युवकांचा वापर होऊ नये, ही आमची भूमिका आहे, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

पोषण आहारात गैरप्रकार आढळल्यास FDA कारवाई करेल

विद्यार्थ्यांना चुकीचा अथवा निकृष्ट पोषण आहार पुरवला जात असल्याचे आढळल्यास अन्न व औषध प्रशासनाकडून (FDA) नियमानुसार कारवाई केली जाईल. या कारवाईमध्ये महसूल विभागाचा कोणताही हस्तक्षेप राहणार नाही, असेही बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

नवनीत राणा यांच्या भूमिकेबाबत संभ्रम नको

नवनीत राणा यांच्या कथित नाराजीबाबत विचारले असता बावनकुळे म्हणाले की, कालचा कार्यक्रम राष्ट्रीय स्तरावरील होता आणि आपण त्या कार्यक्रमाला एकटेच उपस्थित होतो. त्यामुळे कालच्या दौऱ्याचा अन्य कोणताही राजकीय संदर्भ काढण्याची गरज नाही. राष्ट्रवादी काँग्रेसकडून राज्यसभा निवडणुकीसाठी त्यांना ऑफर होती. मात्र, त्यांनी हिंदुत्ववादी भूमिका स्वीकारून युवा खासदार म्हणून काम केले आहे. त्यांचे संपूर्ण राजकीय जीवन भाजपसाठीच असेल. त्यामुळे त्यांच्या भूमिकेबाबत कोणताही संभ्रम निर्माण करण्याची गरज नाही, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

**पारशिवनीतील सुपीक जमीन घेण्यास शेतकऱ्यांचा विरोध असल्यास मार्ग काढू**

पारशिवनी येथील जमीन प्रकरणावर बोलताना बावनकुळे म्हणाले की, शेतकऱ्यांची सुपीक जमीन घेऊ नये, अशी त्यांची भूमिका आहे. तीन-चार शेतकरी आपल्याला भेटले आहेत. शेतकऱ्यांचा काही गैरसमज अथवा समज असेल तर त्यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा केली जाईल. सुपीक जमीन जाणार असेल आणि शेतकऱ्यांचा तीव्र विरोध असेल तर त्यातून योग्य मार्ग काढला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

शेतकऱ्यांना माती, रेतीवरील रॉयल्टीतून दिलासा

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी महसूल विभागाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. शेतातील पडीत किंवा असमतल जमीन सपाट करण्यासाठी मोठ्या प्रमाणात माती व इतर साहित्याची गरज भासते. शेतीच्या कामासाठी लागणारी माती व रेती घेण्यासाठी आता रॉयल्टी आकारली जाणार नाही, असे बावनकुळे यांनी सांगितले. याबाबत तहसीलदार, तलाठी आणि पोलिसांना आदेश देण्यात आले आहेत. शेतीच्या कामासाठी आवश्यक साहित्य वापरताना शेतकऱ्यांना अनावश्यक त्रास होऊ नये आणि त्यांना आर्थिक दिलासा मिळावा, या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**पुढील सहा महिन्यांत सर्व नागरी सुविधांची कामे पूर्ण करण्याचे निर्देश**

नागपूर जिल्ह्यातील नरखेड तालुक्यातील पूरग्रस्त १३ गावांच्या पुनर्वसित वसाहतींमध्ये तब्बल ३० वर्षांनंतर नागरी सुविधा उपलब्ध होणार आहेत. या कामांसाठी निधी मंजूर केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानत, पुढील सहा महिन्यांत सर्व नागरी सुविधांची कामे पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात येतील, अशी माहिती महसूलमंत्री तथा नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

या १३ गावांतील नागरिकांचे पूरानंतर स्थलांतर करण्यात आले होते. मात्र, पुनर्वसनानंतरही अनेक वर्षे मूलभूत नागरी सुविधांचा अभाव होता. काटोलचे आमदार चरणसिंह ठाकूर यांनी गावांच्या प्रश्नासाठी सातत्याने बैठका घेऊन पाठपुरावा केला आणि आपल्याकडे मागणी केली होती. त्यानंतर या प्रश्नाला गती मिळाली, असे बावनकुळे यांनी सांगितले. पालकमंत्री म्हणून या गावांना ३० वर्षांनंतर नागरी सुविधा मिळत असल्याचा आनंद असल्याचेही त्यांनी नमूद केले

# महावितरणचे संचालक श्री. राजेंद्र पवार यांना राष्ट्रीय 'एमिनेंट इंजिनियर' पुरस्कार प्रदान

## महसूलमंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्याहस्ते सन्मान

दै. सिंहवाणी वृत्त.

**नागपूर,:** महावितरणचे संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांच्या विद्युत क्षेत्रातील योगदानाबद्दल 'द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्स' (भारत) संस्थेचा 'एमिनेंट इंजिनियर' हा राष्ट्रीय पुरस्कार अमरावती येथे शुक्रवारी (दि. २१) राज्याचे महसूलमंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्याहस्ते प्रदान करण्यात आला.

'आयईआय'च्या ४१ व्या राष्ट्रीय विद्युत अभियंता अधिवेशनाचे अमरावती येथे शुक्रवारी (दि.२१) उद्घाटन झाले. या अधिवेशनात 'विकसित भारताचे ध्येयः एआय आणि हरित तंत्रज्ञानाद्वारे ऊर्जा क्षेत्राचा कायापालट' या विषयावर विचारमंथन झाले. सायंकाळच्या सत्रात 'आयईआय'च्या वतीने जाहीर झालेला 'एमिनेंट इंजिनियर' पुरस्कार महावितरणचे संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांना महसूलमंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्याहस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी आमदार श्री. प्रवीण पोटे, आमदार श्री. प्रवीण तायडे, 'द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्स'चे (भारत) अध्यक्ष श्री. मनिष कोठारी, पदाधिकारी श्री. आनंद जवंजाळ, श्री. राम विघे, श्री. आर. आर. तंवर, श्री. सुनील राठी आदींची उपस्थिती होती.



अमरावती येथे 'एमिनेंट इंजिनियर' हा पुरस्कार महसूलमंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्याहस्ते महावितरणचे संचालक श्री. राजेंद्र पवार यांना प्रदान करण्यात आला.

'अभियंता हे देशाच्या जडणघडणीचे शिल्पकार आणि मानवी प्रगतीचे शिलेदार आहेत. भारताच्या अभियंत्यांनी अफाट कौशल्याच्या जोरावर जगात अव्वल स्थान निर्माण केले आहे. जगातील सर्वोत्तम अभियंते भारतात आहेत. विद्युत क्षेत्रातील अभियंत्यांची अद्भूत कार्यक्षमता ऊर्जामंत्री म्हणून काम करताना मी जवळून अनुभवली आहे. एलिफंटा बेटासारख्या दुर्गम ठिकाणी समुद्रामधून भूमिगत वाहिनीद्वारे वीज पोहोचवण्याचे अशक्यप्राय आव्हान महावितरण व महापारेषणच्या अभियंत्यांनी लिलया पेलले. हा प्रकल्प म्हणजे भारतीय अभियांत्रिकीच्या कौशल्याचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे!' अशा शब्दांत महसूलमंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी अभियंत्यांचा सन्मान केला. याआधीच्या सत्रात संचालक श्री. राजेंद्र पवार यांनी विकसित भारत २०४७ चे ऊर्जा उद्दिष्टः आधुनिक ऊर्जा सुलभतेचा आराखडा आणि महाराष्ट्राची आघाडी' या विषयावर सादरीकरणाद्वारे माहिती दिली.

देशातील सर्वात मोठी व्यावसायिक संस्था असलेल्या 'द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स इंडिया'ची स्थापना १९२० मध्ये झाली आहे. कोलकाता मुख्यालय असलेल्या या संस्थेचे देशभरात १२५ पेक्षा अधिक स्थानिक केंद्र आहेत. विद्युत क्षेत्रामधील ३७ वर्षांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल श्री. राजेंद्र पवार यांचा या संस्थेकडून 'एमिनेंट इंजिनियर' राष्ट्रीय पुरस्काराने गौरव करण्यात आला.

# आदिवासी विध्यार्थी संघ, गोंदिया जिल्हा यांच्यातर्फे सामाजिक आवाहन



दिनांक २१ ऑगस्ट २०२६ ला आदिवासी विद्यार्थ्यांच्या ठिय्या आंदोलनाला भेट व पाठिंबा.

देवरी-- प्रकाश टेंबरे आदिवासी विकास विभाग अंतर्गत आदिवासी विद्यार्थ्यांच्या विकासाला मारक ठरणारा जी. आर. दि. ५ ऑगस्ट २०२६ चा महाराष्ट्र शासनाने निर्गमित केला. त्या मध्ये अनेक जाचक अटी लादण्यात आल्या आहेत. त्या विरोधात आदिवासी विद्यार्थी संघ व आदिवासी संघटना यांनी आवाज उठवला व तीव्र विरोध दर्शवला. त्यामुळे शासनाने ५ ऑगस्ट चा जी. आर. रद्द करून नव्याने पुनरसंशोधित जी. आर. दि. १४ऑगस्ट ला काढण्यात आला तर आपण त्यामध्ये अनेक त्रुट्या हेतूपुरस्सर ठेवण्यात आल्या. त्यामुळे संपूर्ण जि. आर. बदलण्यात यावा या मागणीसाठी राज्य भर आंदोलन सुरू आहेत.

सदर आंदोलनाला पांठिबा देण्यासाठी आदिवासी लोकप्रतिनिधींनी व जिल्हा परिषद सदस्य व माजी जिल्हा परिषद सदस्य यांनी आंदोलनाला स्थळी -आदिवासी प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास विभाग, देवरी येथे भेट दिली व विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवण्यासाठी आर्थिक मदत करून तन-मन-धन पणाने पाठिंबा जाहीर केला.

पाठिंबा जाहीर करते वेळी उपस्थित सौ. रजनीताई कुंभरे समाजकल्याण सभापती जिल्हा परिषद गोंदिया श्री जियालाल पंधरे माजी जिल्हा परिषद सदस्य श्री हनवंतरावजी वट्टी जिल्हा परिषद सदस्य सौ. पूजाताई धृर्वे माजी समाजकल्याण सभापती कु. वैशाली ताई पंधरे जिल्हा परिषद सदस्यां सौ. अनंदाताई वाढवे जि. प. सदस्यां सौ.ममता ताई वाढवे जि. प. सदस्यां श्री विजयजी उईके जि. प. सदस्य उपस्थित होते.

# अॅड. सुधाकर भोले लिखित 'संविधानातील मूलभूत अधिकार' पुस्तकाचे थाटात प्रकाशन



दै. सिंहवाणी वृत्त.

**नागपूर, :** अॅड. सुधाकर भोले लिखित 'संविधानातील मूलभूत अधिकार, मानवाधिकार आणि माहितीचा अधिकार' या पुस्तकाचे प्रकाशन शनिवारी बुधवार बाजार, सक्करदरा येथील संताजी सांस्कृतिक सभागृहात आयोजित सोहळ्यात मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

मुंबई उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायमूर्ती तथा महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूरचे माजी उपाध्यक्ष मुरलीधर गिरटकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाला आमदार अॅड. अभिजीत वंजारी, सहायक पोलीस आयुक्त नरेंद्र हिवरे, आंतरराष्ट्रीय ह्युमन राइट्स असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष विलास कांबळे तसेच तेली समाज सभा, नागपूरचे अध्यक्ष अॅड. नरेंद्र ढगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

संविधानाने नागरिकांना दिलेले मूलभूत अधिकार, मानवाधिकार तसेच माहितीच्या अधिकाराची संकल्पना सर्वसामान्यांना सोप्या भाषेत समजावी, या उद्देशाने पुस्तकाची निर्मिती करण्यात आली आहे. संविधानातील अधिकारांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी हे पुस्तक उपयुक्त ठरेल, असा विश्वास मुरलीधर गिरटकर यांनी व्यक्त केला.

अॅड. अभिजीत वंजारी यांनी अॅड. सुधाकर भोले यांच्या कार्याचे कौतुक करताना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

अॅड. सुधाकर भोले यांनी पुस्तक लिखाणामागची भूमिका विशद केली. इतरही मान्यवरांची यावेळी भाषणे झाली.

कार्यक्रमाला गौरी शिंदे, पंकज शिंदे, अमर बागडे, चंद्रमणी बोरकर, किशोर खनके, नंदा खनके, अॅड. बी. के. पाल, सच्चिदानंद दारुन्डे, दादाकांत धनविजय, अॅड. नामदेव गव्हाळे, आनंदराव ढोबळे, हरिहर मालोदे, अॅड. वैशाली खराळकर, कमलेश गुम्बले, अपर्णा गुम्बले, अर्चना जैन, रत्ना भोले, सुधीर टेटे आणि लोकनाथ भुरे यांच्यासह नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

गौरी शिंदे व चमूने स्वागतगीत सादर केले. अनिल फुलझेले यांनी सूत्रसंचालन केले. सोहळ्यादरम्यान संगीताचा कार्यक्रमही झाला.

# सावनेर तालुक्यात मत्स्यव्यवसाय विभागाची धडक कारवाई

## ७४ टन प्रतिबंधित 'मांगूर' प्रजातीचे मासे केले नष्ट

**नागपूर**, - सावनेर तालुक्यातील दोहडघाट परिसरात मत्स्यव्यवसाय विभागाने २१ व २२ या दोन दिवसीय विशेष मोहीमेत प्रतिबंधित 'थाई मांगूर' मास्यांच्या अवैध मत्स्यपालनावर धडक कारवाई केली. या कारवाईत शेततळ्यांमधून सुमारे ७४ टन जिवंत मांगूर मासे जप्त करून त्यांची वैज्ञानिक पद्धतीने विल्हेवाट लावण्यात आली. या बेकायदेशीर मत्स्यपालनाप्रकरणी संशयित बाडू शेख याच्यावर पोलिसांत एफआयआर (FIR) दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

मत्स्यव्यवसाय सहाय्यक आयुक्त कार्यालयामार्फत गेल्या ३ महिन्यांपासून जिल्ह्यात राबवल्या जाणाऱ्या विशेष मोहिमेअंतर्गत आतापर्यंत १५० टनांहून अधिक मांगूर माशांचा साठा नष्ट करून नागपूर परिसरातील अवैध नेटवर्क मोडून काढण्यात आले आहे.





सदर कारवाई प्रादेशिक उपआयुक्त सुनील जांभुळे यांच्या मार्गदर्शनाखाली व सहाय्यक आयुक्त शुभम कोमरेवार यांच्या नेतृत्वात पार पडली. मोहिमेत मत्स्यव्यावसाय विकास अधिकारी प्रशांत वैद्य, सहाय्यक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी निखिल नारद, अंकित वैद्य, जितेश केशवे, शिवानंद पाटील, सतीश क्षीरसागर, अविनाश सदावर्ती यांनी सक्रिय भूमिका बजावली.

मांसाहारी व आक्रमक प्रवृत्तीच्या थाई मांगूरमुळे स्थानिक प्रजातींना व नैसर्गिक परीसंस्थाना मोठा असतो. या कार्यवाही मुळे पर्यावरण संतुलनाला मदत होईल. दूषित पाण्यात वाढणाऱ्या व निकृष्ट खाद्य खाणाऱ्या या मास्यांच्या सेवनामुळे नागरिकांच्या आरोग्यावर होणारे गंभीर दुष्परिणाम रोखण्यात मदत होईल असे प्रादेशिक उपआयुक्त सुनील जांभुळे यांनी सांगितले.

या कारवाईमुळे स्थानिक प्रामाणिक मत्स्यपालकांना योग्य बाजारपेठ आणि न्याय मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पर्यावरण व मानवी आरोग्यास घातक असणाऱ्या थाई मांगूरचे पालन किंवा विक्री करणाऱ्यांवर अशीच कठोर फौजदारी कारवाई सुरू राहील, असा इशारा मत्स्य व्यवसाय विभागाने दिला आहे.

# नागपूर महानगराच्या वाढत्या विस्तारासोबत कायदा व सुव्यवस्था बळकट करणार

## सीसीटीव्ही व पायाभूत सुविधांसाठी शासनाच्या आवश्यक मान्यता; नवीन पोलीस

दै. सिंहवाणी वृत्त.

**नागपूर,:-** महानगराचा झपाट्याने विस्तार होत असून वाढत्या लोकसंख्येसोबत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस यंत्रणा अधिक सक्षम करण्यावर शासनाचा भर आहे. त्यासाठी सीसीटीव्ही यंत्रणा तसेच आवश्यक पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी शासनाने आवश्यक त्या सर्व मान्यता दिल्या आहेत. काही ठिकाणी नवीन पोलीस ठाण्यांनाही मान्यता देण्यात आली आहे. याचबरोबर याला लागणाऱ्या जागेबाबतही शासनाने दिलेल्या निर्देशानुसार याच्या तत्पर उभारणीसाठी नागपूर महानगर विकास प्राधिकरण, महानगर पालिका व जिल्हा प्रशासनाने समन्वय साधून याला प्राधान्य देण्याचे निर्देश महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

जिल्हा नियोजन भवन येथे याबाबत त्यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी आमदार डॉ राजीव पोतदार, आ. डॉ नितीन राऊत, मनपा आयुक्त डॉ विपीन इटनकर, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, सह पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.





नागपूर शहराचा विस्तार लक्षात घेता भविष्यातील गरजा विचारात घेऊन पोलीस यंत्रणेसाठी आवश्यक जागा, पायाभूत सुविधा, सीसीटीव्ही नेटवर्क आणि इतर सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन याचा संबंधित सर्व विभागांनी वेळोवेळी आढावा घेतला पाहिजे. मंत्रालय स्तरावर मंजूर कामांबाबत जर मान्यता प्रलंबित असतील तर त्या तत्काळ दिल्या जातील असे त्यांनी स्पष्ट केले.

परमात्मा एक सेवक मानव धर्म पावडदौणा आश्रमाचा होणार विकास

जिल्ह्यातील लाखो भाविकांची श्रद्धा असलेल्या मौदा तालुक्यातील पावडदौणा येथील श्री जुमदेबाबा आश्रमाचा विकास केला जाणार आहे. यात भक्त निवास, प्रार्थना सभागृह, सुलभ शोचालयाचे आठ संकुल, पाणी पुरवठा, सौर ऊर्जा, वाहन तळ आदी कामांचा समावेश आहे. यासाठी सुमारे ७५ कोटी रुपयांचा निधी, ब वर्ग यात्रास्थळ दर्जा अंतर्गत कामे प्रस्तावित करण्यास पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

राष्ट्रीय आरोग्य अभियान व राष्ट्रीय आयुष अभियानांतर्गत कामठी विधानसभा क्षेत्रातील एकात्मिक आरोग्यवर्धिनी समितीची यावेळी बैठक घेण्यात आली. आरोग्य सेवा अधिक प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या. बैठकीस येरखेडा नगरपंचायतचे नगराध्यक्ष राजकिरण बर्वे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निवृत्ती राठोड, कामठी तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. सुरेश मोटे, मौदा तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. राकेश नंदेश्वर, नागपूर जिल्हा माता-बाल संगोपन अधिकारी डॉ. रेवती साबळे, डॉ. प्रीतीताई मानमोडे तसेच समिती सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

# स्वयंपूर्ण आवास रूफटॉप' योजनेतून अल्प खर्चात घराघरांत 25 वर्षे मोफत सौर ऊर्जा

दै. सिंहवाणी वृत्त.

**नागपूर, :-** स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफ टॉप अर्थात 'स्मार्ट' योजनेअंतर्गत दारिद्यरेषेखालील व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या घरांवर अत्यल्प खर्चात सौर ऊर्जा प्रकल्प बसविण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. केंद्र व राज्य सरकारच्या दुहेरी अनुदानामुळे लाभार्थींना अल्प हिस्सा भरून एक किलोवॅट क्षमतेचा सौर प्रकल्प उभारता येणार असून, पुढील सुमारे 25 वर्षे मोफत वीज मिळण्याचा लाभ होणार आहे.

या अनुदानाच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांना स्वच्छ व स्वस्त ऊर्जा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाच्या आर्थीक पाठबळावर महावितरणने हाती घेतलेल्या स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफटॉप सोलर म्हणजेच स्मार्ट योजना' राबवली जात आहे. 100 युनिटपर्यंत मासिक वीज वापर असणाऱ्या ग्राहकांना 1 किलोवॅट क्षमतेची सौर ऊर्जा यंत्रणा 80 ते 95 टक्के इतक्या मोठ्या अनुदानावर उपलब्ध करून दिली जात आहे.



नागपुर जिल्ह्यात या योजनेला प्रतिसाद वाढत असून आत्तापर्यंत तब्बल 725 ग्राहकांना अंदाजपत्रक देण्यात आले असून त्यापैकी 78 ग्राहकांनी पैशाचा भरणा देखील केला आहे. या ग्राहकांनी सौर पॅनल विक्रेत्याची निवड करताच त्यांच्या छतावर सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारण्यास मंजूरी दिली जाणार असून आत्तापर्यंत जिल्ह्यातील 6 ग्राहकांच्या छतावरील हे प्रकल्प कार्यान्वित करण्यात आले आहेत. जिल्ह्यातील सोळा हजारापेक्षा अधिक घरगुती ग्राहकांना या योजनेचा लाभ देण्याचे महावितरनचे उद्दिष्ट आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी सप्टेंबर 2024 ते ऑक्टोबर 2025 या कालावधीत ग्राहकांचा सरासरी वीज वापर 100 युनिटपर्यंत असणे बंधनकारक आहे. अनुसूचित जाती व जमाती या प्रवर्गातील ग्राहकांना या यंत्रणेसाठी केवळ 5 हजार रुपये भरावे लागतील. 30 युनिटपर्यंत व अत्यंत कमी वीज वापर असलेल्या ग्राहकांना अवघ्या अडीच हजार रुपयांत ही प्रणाली बसवता येणार आहे. इतर मागासवर्गीय व सर्वसाधारण प्रवर्गासाठी लाभार्थी हिस्सा 10 हजार रुपये निश्चित करण्यात आला आहे.

स्मार्ट रूफटॉप सोलर योजनेअंतर्गत 1 किलोवॅट क्षमतेची यंत्रणा बसवल्यास घरगुती ग्राहकांना दरमहा 100 ते 120 युनिटपर्यंत वीज पूर्णपणे मोफत मिळण्यास मदत होणार आहे. सर्वसामान्य व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना केंद्रस्थानी ठेवून शासनाने यासाठी अत्यंत सवलतीचे दर निश्चित केले आहेत. या योजनेत दारिद्र्यरेषेखालील घटकांसाठी केवळ 2,500, अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गासाठी 5,000, तर सामान्य प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या मागास ग्राहकांसाठी 10,000 इतकाच नाममात्र लाभार्थी हिस्सा निश्चित करण्यात आला आहे. प्रकल्पाचा उर्वरित बहुतांश खर्च केंद्र व राज्य शासनाच्या अनुदानातून भागवला जात असल्याने ही योजना सर्वसामान्यांसाठी अत्यंत फायदेशीर ठरत आहे.

घराच्या छतावर बसविण्यात येणाऱ्या या सौर पॅनलमुळे दिवसा तयार होणारी वीज थेट घरगुती वापरासाठी मिळेल. यामुळे वीज बिलात मोठी बचत होऊन आर्थिक भार हलका होईल. तसेच पारंपरिक ऊर्जेवरील ताण कमी होऊन पर्यावरणपूरक वीज वापराला प्रोत्साहन मिळणार आहे. पात्र ग्राहकांनी योजनेच्या नोंदणीसाठी जवळच्या कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

**उपमुख्य जनसंपर्क अधिकारी, महावितरण, नागपूर**